
स्मिता गानू जोगळेकर

# गोष्टी छोट्याच असतात



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# गोष्टी छोट्याच असतात

लेखिका : स्मिता गानू जोगळेकर

# गोष्टी छोट्याच असतात

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# गोष्टी छोट्याच असतात

लेखिका : स्मिता गानू जोगळेकर .

ईमेल : smita_dj@hotmail.com

पत्ता : एम २५२ , रिझर्व्ह बँक कवॉर्टर्स , नॉर्थ अव्हेन्यू , सांताक्रूझ पश्चिम . मुंबई ४०००५४.

फोन : ९८९२५५१९५०

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ४ जुलै २०१९ (गुरुपुष्यामृतयोग)

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लेखिकेचा परिचय



नाव : **स्मिता देवदत्त जोगळेकर .**

व्यवसाय : बँकर .

पत्ता :

एम २५२, रिझर्व्ह बँक कवॉर्टर्स,

नॉर्थ अव्हेन्यू, सांताक्रूझ पश्चिम.

मुंबई ४०००५४.

फोन : ९८९२५५१९५०

आजवरचे लिखाण :

१ ) सामना-शनिवारच्या फुलोरा पुरवणीमध्ये ' छोटी बातें ' हे सदर Feb 2016 – Nov 2016.

२ ) ललित कादंबरी ' मन माणूस इत्यादी ' ( शब्दांजली प्रकाशन पुणे ) प्रकाशित . ( गिरीजा कीर ललितलेखन पुरस्कार प्राप्त ).

३ ) स्वतःच लिहिलेल्या अनेक ललितबंधांचे आकाशवाणी मुंबई केंद्रावर टॉकर म्हणून वाचन.

४ ) कथा / कविता / प्रवास वर्णन / ललित लेख / प्रतिक्रिया > लोकसत्ता / महाराष्ट्र टाईम्स / दिव्य मराठी / मैत्रीण / मिळून साऱ्याजणी / रोहिणी / देशदूत (बँकिंग विशेषांक ) / सकाळ / 'व' / श्री अक्षरधन / युनिक फीचर्सचे अनुभव - भटकंती - कॉमेडी कट्टा / रुची / कोमसाप चे कलामंच / ठाणे वैभव

/ पुस्तक 'मिळवतीची  पोतडी'मध्ये लेख / तनिष्का / IPH चे मैत्र / दैनिक सकाळ रविवार सप्तरंग पुरवणी.

५ ) दिवाळी अंक लिखाण > अक्षर / चैत्राली / मुंबई मराठी साहित्य संघाचे ' साहित्य ' / आपला डॉक्टर / अनामिका / शूर सेनानी / दैवज्ञ श्री / मुक्त संवाद /  रसिक साहित्यचे 'साहित्य सूची' / नव निर्माण / माझं कोकण / e सृजन / डोंबिवली ग्रंथ संग्रहालय स्मरणिका.

६ ) राज्यस्तरीय व अन्य बक्षिसे > कथा ( साहित्य सूची सिक्वेल लेखन ) / अवतरण अकादमीची कथा कविता एकांकिकेची बक्षिसे / श्री अक्षर धन - कविता / को म सा प - कविता  /


७ ) अक्षरमानव प्रकाशन तर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय लेखन स्पर्धेमध्ये कथा , कविता व कादंबरी या तीनही गटात उल्लेखनीय लिखाणात समावेश

इंडियन कल्चरल सोसायटी - कविता / राजगुरू ट्राव्हेल - माझा संस्मरणीय प्रवास लेह् लडाख /

८ ) चैत्राली ललित लेखन पुरस्कार / बँक होम मॅगझीन हिंदी - मराठी / व इतर अनेक बक्षिसे .

९) लेखिकेचे संपूर्ण शालेय शिक्षण गुजराती माध्यमातून झालेले असून , अमदावादच्या विज्ञान मासिक गुजराती 'सफारी' मधील अनेक लेखाचे पुण्याच्या 'संदर्भ' मासिकासाठी मराठीमध्ये अनुवाद .

# गोष्टी छोट्याच असतात : मनोगत :



मनोगत वगैरे नको. तुमची आमची गोष्ट म्हणूया. आणि त्या गोष्टीबद्दल चार शब्द बस.

गोष्टी छोट्याच असतात म्हणून गोष्टी सांगणाऱ्या व्यक्तीचं मनोगतही छोटंच हवं, नाही का!

मुळात आपलं आयुष्य छोटं असतं आणि त्यात घडणाऱ्या गोष्टी त्याहून छोट्या. मात्र या गोष्टींचं छोटेपण मोठेपण बघणाऱ्याच्या दृष्टीवर अवलंबून असतं आणि याच दृष्टीप्रमाणे गोष्टींची खोली, ऊंची, व्याप्ती आणि समग्र परिमाण बदलतं. म्हणजेच सापेक्षतेचा सिद्धांत एकूणच जगण्याच्या प्रत्येक घटनेला, प्रत्येक क्षणाला लागू होतो.

प्रत्येक माणूस चष्मे लावून वावरत असतो. दृश्य किंवा अदृश्य चष्मे. चष्मे आपले आणि समोरच्याचे. या चष्म्यांची किंचित अदलाबदल करता, कलायडोस्कोपचा कोन बदलल्यावर सर्वस्वी नव्या आकृती समोर याव्यात तद्वत परिस्थितीची निराळीच रूपे नजरेसमोर येतात. आणि तद्दन नवीन भाष्य करून जातात. म्हणूनच छोट्या वाटणाऱ्या गोष्टी सुद्धा क्षण दोन क्षण हलवून जातात. अमाप सुख किंवा काळीजकातर वेदना देऊन जातात. विचार करण्यास भाग पाडून जातात. घटना अगदी आपल्या आसपास घडत असतात, फक्त त्या 'दिसणं' गरजेचं असतं.

माझ्या छोट्या छोट्या टिपणवजा लिखाणात आसपास घडणाऱ्या याच गोष्टी चिमटीत पकडण्याचा प्रयत्न केला आहे. फार भव्यदिव्य घटना किंवा त्यावरचं विचारवंताच्या भूमिकेतून केलं गेलेलं भाष्य नसेलही पण मनाच्या खोल आत ज्याचे पडसाद उमटू शकतात अशा या घटना किंवा माणसं. घरी, दारी, प्रवासात, ऑफिसमध्ये कुठेही भेटलेली माणसं. दिवसाचे नऊ दहा तास ज्या ठिकाणी व्यतीत होतात त्या ऑफिसच्या घटना लिखाणात येणं अर्थातच अपरिहार्य. बँक किंवा बँकिंग बद्दल लिहिताना त्यात फक्त पैसे आणि आले किती गेले कितीचे हिशेब नसून तिथेही भेटणाऱ्या माणसाच्याच गोष्टी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

पुस्तक सहज हाती घ्यावे कोणतेही पान उघडावे एखादं टिपण सहज वाचून टाकावे अशा या सहज सोप्या साध्या नोंदी.

पुस्तकाच्या मनोगतात आभार प्रदर्शन करण्याची पद्धत असते. मात्र पुस्तकासाठी विषय देणाऱ्या प्रत्येकाचे आभार मानायचे झाल्यास यादी अफाट लांबत जाईल, तेव्हा त्या सगळयांना मनोमन फक्त वंदन करू शकते.

असो. फार न बोलावे. ऐकावे बघावे व्यक्त व्हावे. आणि काय!

स्मिता गानू जोगळेकर.

ईमेल : smita_dj@hotmail.com

पत्ता : एम २५२ , रिझर्व्ह बँक कवॉर्टर्स , नॉर्थ अव्हेन्यू , सांताक्रूझ पश्चिम . मुंबई ४०००५४.

फोन : ९८९२५५१९५०



" काहीतरी असतं, काहीतरी नसतं

आणि नेमकं तेच पकडता येत नाही

असलेलं नसलेलं

नात्यातलं काहीतरी

नेमकेपणी ."

# अनुक्रम


१. गुड मॉर्निंग सुस्वागतम.

२. पिढी दर पिढी

३. कांदे पोहे

४. गाडगीळबाई

५. हमारी औरते.

६ . कलाकार आणि मंद धून.

७. अक्का.

८ आयुष्याचे गुंते

९. अदृश्य छडी

१०. मान अपमान

११. ओला आणि ओलावा.

१३. आठवणी.

१४ छोटे ग्राहक मोठं प्रेम.

१५ कुपीतून आणावा सुगंध.

१६. बदलत्या वयाचे निकष निराळे.

१७ सहजीवन आणि सकारात्मकता.

१८. छोटे ग्राहक नव्या नोटा

१९. माणसातला माणूस.

२०. पार्टनरचं जाणं.

२१ अन्नदान.

२२. बाबा तुमचं पार्सल

२३ आठवणींच्या परड्या.

२४ . मी आणि लिरीलची जाहिरात.

२५. मला आवडतं म्हणून.

२६ संस्कारांच्या मूळापाशी.

२७ भेटलेली छोटी पण खूप मोठी माणसं.

२८. पूरात वाहून गेलेल्या आठवणी.

२९ मोठे झालेले भाचे पुतणे वगैरे.

३०. सलाम तिच्या जिद्दीला.

३१ गावच्या आठवणी खोल उरात

३२. एक सॅकची गोष्ट.

३३. चटपटीत मुलं.

३४. माधुकरी.

३५ कसारा लोकल आणि केशरी गंमत.

३६ तीन पैशाचा तमाशा.

३७. अद्रकवाली चाय.

३८. बाबाची बेटी.

३९ बरकतवाले हाथ.

४० तरंग आणि बुलबुलतरंग.

४१ सचिनची सखी.

४२ गाडी बाबांकडून शिकेन.

४६ श्रद्धा अंधश्रद्धा ज्याच्या त्याच्या

४७ सुजाण माय.

४८ वाडी आणि बरंच काही.

४९. माई आणि प्रकाश.

५० नितळ संगीत.

५१. बाबा तू ऐकतोयस ना!

## *१. गुड मॉर्निंग सुस्वागतम.*

सकाळी माझं चहाचं आधण ग्यासवर चढायच्या आधीच खिडकीत मंडळी वाट बघत असतात. दिवा सुद्धा लावत नाही मी आणि त्यांच्या सावल्या दिसू लागतात. मग कालची मुद्दाम उरवलेली कणिक झोपाळ डोळ्याने बाहेर काढते, ती दोन तळहातांमध्ये काही क्षण धरून उबदार करते, स्लायडिंग सरकवते आणि कणकेचे छोटे गोळे त्यांच्या पुढ्यात ठेवत म्हणते " हं घ्या, गुड मॉर्निंग " एक कावळा, दोन तीन कावळे.

मग चहा उकळतो, एक कप दोन कप तिसरा कटिंग, एकीकडे भाजी पोळी नाश्ते आपापल्या भूमिकेत शिरतात.

पोपट झाडावर बसून सगळं बघत असतो, मीही त्याला मधूनच बघते, तो येतो कि मी बोलावते असा खेळ आमचा रोज चालतो, तो कधीतरी माघार घेतो, खिडकीत येऊन बसतो पण हाक मारत नाही म्हणजे थोडीशी लबाडी असतेच असते, मी तिरप्या नजरेने त्याला न्याहाळत असते, पेशन्स संपला कि तो टीर्रीssssक शिट्टी मारतो, मी हसते पोळीचा तुकडा थेट त्याला चोचीत भरवते, ओहो ओहो, चिडलं का बाळ माझं! आम्ही दोघे खुश होतो, कधीतरी त्याने येण्याची बोलावण्याची वाट बघत नाही आणि आपण होतच त्याचा घास त्याला देऊन टाकते.

स्लायडिंग विंडो उघडीच असते, त्याच्या एवढ्याशा कट्ट्यावर पोळीचा चुरा असतो, धीट्ट चिमणा येतो, अंदाज घेत त्याची लाजरी बायको येते दोघे एक एक कण चोचीत भरून घेतात, मधेच पाण्याचा एखाद घोट पुन्हा पोळीचे कण, मी तिथेच अगदी एखाद फुटावर बसून हे सगळं न्याहाळत असते, ऑफिसची गडबड असली तरीही.

मधेच येऊन कावळे पाणी पितात, वर मान करून घोट गिळतात बरंच पाणी त्यांच्या मानेवरून ओघळत राहतं, मी विचारते, मज्जा येतीये ना पाणी पिताना? गारेगार .... काय!

पक्षी अगदी जवळ येतात, असेही आणि मनानेही. विश्वासाने जेवतात पाणी पितात, 'माणसा'ची भीती वाटत नाही त्यांना हि आपली अचिव्हमेंट असं आपण खुशाल समजतो खरं तर हे त्यांचं मोठेपण असतं.

एकूणच फार गुंतवणूक नसते पण परतावा भरभरून असतो, आयुष्यभर पुरेल एवढा.

पक्षी आभाळात जातात आणि आभाळ स्वतः पक्षी होऊन जाते.

## २. पिढी दर पिढी

माणूस चांगला वाईट असतो. आई सुद्धा माणूस असते म्हणूनच तीही चांगली किंवा वाईट असू शकते हे मान्य करूनच हि पोस्ट.

"" कणिक अशीच भिजली पाहिजे, भांडी तशीच लावली पाहिजेत. "

पण का?

तिला आठवलं ती हि असाच वाद घालायची तिच्या आईशी. आईचे हात चालायचे सोबत शब्दांची महिरप " ताक झाल्यावर गंज नीट निपटून घ्यायचा, लोण्याचा गोळा गरगरीत दिसला पाहिजे, खरकटी भांडी तशीच मोरीत टाकायची नाही, एकतर अन्न शिळं झालं कि दुर्गंध येतो आणि दुसरं म्हणजे भांडी घासणारी मावशी सुद्धा माणूस आहे तिला आपली कुठलीही घाण साफ करायला लावायची नाही. माणसाला माणूस म्हणून वागवायला हवे किंवा मान दिला तरच मान मिळतो वगैरे "

या सगळ्या सूचनांचा जाच वाटे तेव्हा.

साधं कपड्याला हातशिलाई करायची झाली तरी आई मागे असायचीच " प्रत्येक टाका एकसारखा सुबक नेटकाच यायला हवा, शिवण नक्षीसारखी दिसली पाहिजे " तेव्हा या सगळ्या गोष्टी किचकटपणाच्या वाटत कारण लक्ष बाहेरच्या मित्रमैत्रिणींमध्ये गुंतलेलं असे. या असल्या गोष्टींमध्ये कशाला वेळ घालवत बसायचं? काम झाल्याशी काम म्हणत आईचं म्हणणं धुडकावलं जात असे.

आज आई झाल्यावर मात्र कळतंय, आई होणं हि खूप छान प्रोसेस असते आणि त्यामध्ये खूप खोल अर्थ आपोआप येत जातो.

"चल तुला शिकवते " असं प्रत्यक्ष न म्हणताही आई सतत काहीतरी शिकवत असते, संस्कार-संस्कृती असे मोठे शब्द न वापरता ती ते जगत असते तिलाही ठावूक नसतं आणि आपण केवढं काय शिकलो हे लेकीला सुद्धा कळत नाही. मात्र लेक शिकतच असते आणि प्रत्यक्ष आई झाल्यावर तीच लेक आईच्या समंजस प्रौढ भूमिकेत अलगद शिरते. शिकण्या-शिकवण्याचे नितांत सुंदर चक्र निरंतर फिरत राहते जगाला समृद्ध करत, पुढे नेत.

आई नामक अबोल गुरू साठी. _/!_

# ३. कांदे पोहे

"बरे झालेत का पोहे? " मुलाच्या आईनं विचारलं.

"हंsss बरे आहेत, थोडं मीठ चाललं असतं " मुलगी उत्तरली.

कोणाला हा अगोचरपणा वाटेल पण अगोचरपणा नसून सहज संवाद होता तो.

आणि पुढे गप्पाच गप्पा. दाखवण्याचा कार्यक्रम,

म्हणजे.... आम्ही मुलगा बघायला गेलो. मुलाच्या आईने कांदेपोहे केले होते. ईथूनच गोष्टीतलं वेगळेपण सुरू झालेलं लक्षात येईल.

तर, मुलगा एकुलता एक, दिसायला बराबीरा, देशाच्या बँकर्स बँकेत नोकरी म्हंटल्यावर अर्धी लढाई जिंकला होता. बाकी उरली अर्धी.

मुलाशी बोलणं झालं. गप्पांचे विषय, सेन्स ऑफ ह्युमर, बोलण्यातील मोकळेपणा, सहजता जुळत होते, पुढची पाव लढाई जमली.

दाखवणं बघणं वगैरे नसून खूप जुन्या दोस्तांची मैफल असावी असा माहोल.

दिवा स्टेशनला गुड्स ट्रेनचं झालेलं डिरेलमेंट ( 24 Dec 1985 ), बँकेच्या गमतीजमती, चालू विषय, थोडं गाणं, किंचीत पशुपक्षी. काय नी बाय. हसण्याचे धबधबे आणि मोकळा संवाद.

मुलाच्या घरात पुस्तकं दिसत होती आणि लाकडी कॉट (होय तेव्हा लाकडी कॉट असत जे बाहेरच्या खोलीत ठेवलेले असत आणि दिवसा पाव्हणे बसायला आणि रात्री मालक झोपायला वापरत असत तर लाकडी कॉट खाली दिसली वापरात असल्याची ग्वाही देणारी हार्मोनियम. न बोलता खूप संवाद होऊन गेला.

पप्पू पूर्ण पास झाला होता. नुसतं पास नाही डिस्टिंगशन सकट.

आता तेहतीस वर्ष झाली कि या गोष्टीला. मिळवलेल्या डिस्टिंगशनला जागत, पुढे त्यात भरच टाकत गाडी पुढे निघाली.

तर तेहेतीस वर्षांपूर्वी.

" बरं मग निघतो आम्ही, कळवूच काय ते "

"ओके अच्छा "

मुलगी, तिची आई आणि भाऊ जिना उतरून गेले.

मुलगा आणि त्याची आई बाल्कनीत बाय करायला. ( हे बाल्कनीतून/खिडकीतून बाय प्रकरण तेव्हापासून आजवरचं ). तर मुलाची आई म्हणाली " केस छान आहेत बघ तिचे. "

एवढा वेळ मुलाच्या लक्षातच आलं नव्हतं. ( बऱ्याच गोष्टी कोणीतरी दाखवल्यावरच लक्षात येण्याचं हे प्रकरण सुद्धा तेव्हापासूनचंच ) " अरे हो, खरंच कि, मस्तच आहेत " आणि त्याच्या चेहऱ्यावर एक मस्त खुशमिजाज हसू पसरलं.

दुसरा दिवस. मुलगा मुलीच्या थेट ऑफिसात. मुलगी ब्लॅक चुडीदार अँड सिम्पल व्हाईट कुर्ता गळ्याभोवती सहज लपेटलेला दुपट्टा, वय एकवीस फक्त. नो मेकअप. लांबसडक शेपटा बस्स.

मुलाला असं अचानक आलेलं बघून मुलगी गडबडलेली.

मुलगा " मग...... काय ठरलं तुमचं? आमचा तर पक्का होकार आहे "

मुलीच्या ऑफिसमधले सहकारी मिश्किल....... ' हंsss ' वाल्या मूडमध्ये.

"आईला विचारून सांगते " उफ्फ. कांदेपोह्यांच्या दिवशी पोह्यात मीठ थोडं चाललं असतं म्हणणारी मुलगी आणि हे असं गुळमुळीत उत्तर. हंss, होतं असंही होतं.

आणि ठरलं, झालं सुद्धा.

गम्मत म्हणजे मुलगा मुलीच्या घरी गेला नव्हता तर मुलगीवाले मुलगा बघायला आलेले.

आणि पोहे मुलीने नव्हे तर मुलाच्या आईने घाबरत घाबरत केले होते.

" हं..... मीठ चाललं असतं थोडं " म्हणणारी मुलगी आणि दुसऱ्याच दिवशी शब्दशः 'दत्त' म्हणून उभा राहणार मुलगा.

तब्बल तेहतीस वर्षांपूर्वीची गोष्ट पण खूपदा रिवाइंड करून बघितलेली मजेमजेची गम्मत.

छान मित्र असलेल्या आपल्या नवऱ्याला बऱ्याच गोष्टी सांगायचं मुलगी ठरवते. थँक्यू वगैरे जुळवते सुद्धा, पण आपलंच माणूस आहे म्हणत ते प्रत्यक्ष कधी बोलत नाही.

आयुष्य सोपं असतं छान असतं सहज असतं..... करायचं म्हंटलं तर.!

आणि गोष्टी छोट्या पण मनावर मोरपीसागत कोरलेल्या.

## ४. गाडगीळबाई

स्वतःला खूप शहाणे समजणारे आपण, किती किरकोळ असतो, हे काही करकरीत माणसं ( न बोलता ) सतत दाखवून देत असतात.

गोष्ट चार वर्षांपूर्वीची. मावस बहिणीला भेटले. निमित्त नाशिकची मावशी वारली.

नागांव (अलिबाग) हून लग्न होऊन नाशिकला आलेली मुलगी, माझी मावशी. माहेरची मालती सासरी सुहासिनी. ( नाव बदललं तरी आयुष्य तेच, ईतरांना सुगंधीत करणं )

नागावला रोजच्या स्वयंपाकात चार नारळ लागायचे, नाशिकला नारळ फक्त पूजेला. ही नवी मुलगी गडबडून गेली, नारळाशिवाय स्वयंपाक! अशक्य कोटीतील गोष्ट. पण जमवून घेतलं बापडीने, आणि सरत्या वर्षांबरोबर पक्की नाशिककरीण झाली, वेळेच्या बाबतीत निवांत, सॉरी टू से, किंचित अजागळ वगैरे.

परवा तिच्या आठवणी काढत होतो ( हं, ती नव्हती, फक्त आठवणी काढू शकत होतो आम्ही ), मावशीने करायचे टिपीकल लाड पुरेपूर करून घेतले होते आम्ही आमच्या लहानपणी. मावस बहिण जयू सांगत होती. बाजारात जावं, काही वस्तू विकत घ्यावी तर दुकानदार म्हणे " तुम्ही गाडगीळ बाईंची मुलगी ना? "

हो

मग पैसे नको.

कुठे रिक्षाने उतरावं, चालकानं विचारावं " कशा आहेत बाई? " आणि पुढे अर्थातच " पैशाचं राहू द्या " वगैरे. जयू म्हणाली, हा एक विचित्र त्रासच होता, बाईंना सूट ठीक आहे, आम्हाला कशाला!

मावशी असताना तर हे व्हायचंच, पण ती गेल्यानंतर कळलं तिचा गोतावळा केवढा पसरलेला होता ते.

मावशी असताना तिच्या घरी गेलो कि नेहमीचं दृश्य दिसे, पाच वर्ष ते पंधरा वर्षापर्यंतची शाळकरी मुलं तिच्या बाहेरच्या खोलीत दाटीवाटीने बसलेली असत, स्वतःच्या दिसण्याबद्दल तद्दन बेफिकीर मावशी मध्ये बसलेली असे आणि एकाच वेळी सर्वांवर लक्ष, सर्वांशी संवाद असा मामला. मग मुंबईहून आलेल्या आम्हा पाहुणे मंडळींनासुद्धा ट्युशन संपेपर्यंत थांबून

रहावं लागे. अशा प्रकारे एकाच वेळी अनेक इयत्तांचा अभ्यास ही बाई कशी घेते याचं आम्हाला अतोनात आश्चर्य वाटे, पण मुलांचा ओघ वर्षागणिक वाढताच राही.

ट्युशन तर बरीच माणसं बऱ्याच ठिकाणी घेतात त्यात विशेष काही नाही मात्र इथे गोष्ट विशेष होती. ही वेडी बाई झोपडपट्टीत राहणाऱ्या या गरीब मुलांना, कष्टकरी मंडळींच्या मुलांना एक पैसाही न घेता वर्षानुवर्षं शिकवत होती, बरं स्वतःची जहागिरी ऊतू जात होती अशातलाही भाग नव्हता. तिनं जणू ज्ञानदानाचा वसा घेतला होता. पोरांना मन लावून शिकवणारी 'अजागळ' मावशी केवढी भारी होती हे पूर्वी जाणवत होतं पण परवा नव्यानं लक्षात आलं, या शिकवणी यज्ञाबद्दल मध्ये तिचा नाशिकमध्ये सत्कार सुद्धा केला गेला तेव्हा. अर्थात यातल्या कोणत्याच गोष्टीची " मी केलं " टाईप वाच्यता नाही. वेडी कुठली. , आम्हाला या सत्काराबद्दल तिसऱ्याच कोणाकडून तरी कळलं कारण तिच्या लेखी हे प्रकरण "ठीक आहे, त्यात काय मोठं" एवढंच होतं.

शेवटच्या दिवसात मावशी आजारी होती. हॉस्पिटलला ऍडमिट.

आणि हे एवढंच बाकी होतं, हॉस्पिटलमधला पोरसवदा डॉक्टर सुद्धा म्हणाला " मी पेशंटला नव्हे तर माझ्या आवडत्या गाडगीळबाईंना ट्रीट करतोय "

कसली होतीस गं तू, मोठ्या शहरात राहून, पांढरपेशी बाबू टाईप नोकऱ्या करून फार भारी वाटून घेणारे आम्ही .... छे!

" या गोष्टी का राहून जातात " वाटायला लावणाऱ्य गोष्टींपैकी एक म्हणजे मावशीच्या लाईव्ह ट्युशन वर्गाचं व्हिडीओ रेकॉर्डिंग करून ठेवायला हवं होतं . केवढ्या तरी छोट्या जीवांना खूप काही जगणं एक छदामही न घेता खऱ्या अर्थानं शिकवणारी, प्रसंगी स्वतःच्या पदराला खार लावून सगळं निभावून नेणारी गाडगीळबाई!

बरं आहे आज तू नाहीयेस, नाहीतर म्हणाली असतील, काहीही करता गं तुम्ही आजकालची मुलं, या काय प्रदर्शन करायच्या का गोष्टी आहेत?

♡♡. बिनशब्दात माणूस किती काय सांगून जातं.

ह्युमन सायकोलॉजी पुस्तकात शिकण्यापेक्षा प्रत्यक्ष अनुभवण्याची मजा काही वेगळीच असते.

गोष्टी छोट्या असल्या तरी खूप काही शिकवून जाणाऱ्या.

## ५. हमारी औरते.

किस्सा चार वर्षांपूर्वीचा. ओरिसा टूर.

बालुगावला चिलिका लेकच्या कुशीत OTDC च्या हॉटेल मधे आमचा मुक्काम होता.

आम्ही सलिया धरणाकडे निघालो. धरणावर सेक्युरिटी चेक शून्य. माणूसच कुठे दिसत नव्हता. सगळीकडे नितांत सामसूम.

नारळीच्या गर्द झाडांनी वेढलेलं शांत तळं बघून पुढे निघालो. मात्र पुढे एक अथांग 'डोह' भेटणार होता याची कल्पना नव्हती.

आम्ही सहा माणसं होतो. सगळ्यांनी डबल डबल शहाळं घेतलं. सहा माणसांनी बारा शहाळी पिणं म्हणजे मोठा आनंदसोहळा आमच्यासाठी तर होताच पण विकणाऱ्यासाठी तर फारच जास्त. नारळ सोलून होईस्तोवर इकडच्या तिकडच्या गप्पा चालू होत्या.

बातोबातोंमे माणूस मनाच्या आतलं बोलून जातो, आणि वंचितांच्या मनात किती खदखद असते याचा प्रत्यय येत राहतो.

शहाळी विक्रेत्याच्या बायकोसोबत मुलांसोबत काहीतरी बोलत होतो. गोळी चॉकलेटची देवाणघेवाण झाली.

नारळाच्या सालांचे टवके तासत तो म्हणाला " आप लोगोको दस पन्द्रह हजार पगार मिलता होगा, इसलिये आप पिकनिक पर जा सकते है, चाहे वो खा पी सकते है. "

आमची एकमेकांशी फक्त नेत्र पल्लवी झाली.

तो बोलत होता. त्यात विखार किंवा दुःख नव्हतं. परिस्थिती स्विकारलेला एक कोरडा भाव होता.

" और यहाँ हम देखो. दिनभर खेती का काम करते है, खेतोमें कुछ उगता तो नहीं. फिर ये छोटीबडी गाडी चलाते. हमारी औरते केवल चावल पकाती है, बच्चे पैदा करती है, कभी इस गांवसे बाहर पैर भी नही रखती. "

त्याने बोटाने निर्देश केला, तिथे दोनचार बायका पाचसात पोरांना रमवत होत्या.

आमच्याकडच्या गावांमधे.... किंवा शहरातही... वगैरे मनात येणारं बरंच गप्प करत त्याचं बोलणं ऐकू लागलो कारण आम्ही बोलण्यापेक्षा आम्ही 'ऐकणं' जास्त महत्वाचं होतं. शहाळ्याची शकलं सपासप ऊडवत तो बोलतच राहिला.

" हमारे गाँवकी औरते... कभी घरसे बाहर नही निकलती. कभी बिमार पड गई और उनका नसीब अच्छा रहा तो दूसरे गाँवमें डाक्टरके पास लेके जाते है........ नहीं तो!

नहीं तो?

" नहीं तो...... इधरही जला देते है। "

कुठेही बाहेर पाऊल ठेवण्याच्या हरएक शक्यताच जणू जाळून टाकल्यागत तो थंडपणे बोलत होता. "इधरही जला देते है।"

मी तटकन त्याच्याकडे पाहिलं. पण त्याच्या चेहर्‍यावर तोच तो थंड भाव होता. कससंच झालं ऐकून. एसी ऑफिसमध्ये काम करणार्‍या, सगळया कामांसाठी मदतनीस ठेवणार्‍या बायका सतत तक्रारी करताना दिसतात, इथे या बायका आणि अर्थात हि माणसं सुद्धा किती छोट्या परिघात वावरताना दिसतात.

" उनका नसीब अच्छा रहा तो दूसरे गाँव में डाक्टर के पास लेके जाते, नहीं तो इधरही जला देते है। "

शांत तळं आणि अथांग डोह.

हुहः..... गोष्टी छोट्या अजिबात नसतात. छोट्या असल्या तरी तळ ढवळून टाकणार्‍या.

## ६ . कलाकार आणि मंद धून.

फोटो काढायचे राहून जातात आणि मग आपण चुटपुटत राहतो.

बालाजी. बालाजी सुतार माझा फेसबुक मित्र. एक गुणी मुलगा. त्याच्या 'गावकथा'चा प्रयोग बघायला गेलो. प्रयोगाआधी त्याला भेटलो वगैरे. प्रयोग अपेक्षेप्रमाणे भन्नाट आणि भारावून टाकणारा झाला. आपला मित्र किती भारी लिहितो हे बघून प्राऊड वगैरे वाटून घेतलं.

प्रयोग संपल्यावर तडक बाहेर पडलो. तिथेच आसपास होतो. आणि बालाजीचा फोन "कुठे आहात?"

म्हंटलं, आहे इथेच सभागृहाच्या बाहेर पाच मिनिटावर.

असे निघून का बरं गेलात?

फोनवर काय सांगू त्याला?

पुन्हा सभागृहापाशी गेलो. बालाजी खालीच भेटला. गावकथेतली मुलं रिलॅक्स होत होती. बालाजी एकटाच खालच्या स्टॉल जवळ उभा होता.

चहा घेऊया?

नको. तू घे हवं तर.

मी म्हंटलं " खूप दमलेला दिसतोयस ". बालाजी नेहमी प्रमाणे डोळ्यातून हसला.

गावकथाचे एकापाठी एक प्रयोग चालू आहेत. तेही वेगवेगळ्या गावात शहरांमध्ये. प्रवास, शारीरिक मानसिक थकवा. सगळा डोलारा आपल्या खांद्यावर पेलण्याचा ताण. किती नि काय. काय सांगू बालाजीला. आम्ही का बाहेर निघून गेलो?

प्रयोगाआधी किंवा प्रयोगानंतरही कलाकार आपल्या अशा वेगळ्या धुंदीत असतो. कितीही सणसणीत तयारी असली तरी प्रयोगाआधी येणारा बेनाम ताण आणि प्रयोगानंतर, झाल्या प्रयोगातल्या भरीव जागा, टाळ्या किंवा टोचरं बोचरं क्वचित राहून गेलेलं निसटलेलं काही जोंबाळण्याच्या नादात. कदाचित हे माझं वैयक्तिकच राहावं असं मत असेल पण कलाकाराला प्रयोगानंतर त्या धूनमध्ये राहू द्यावं. त्याची हि एकाकी लय तोडू नये असं मला

नेहमीच वाटत आलंय. कार्यक्रम मग तो गाण्याचा असो, नाटक किंवा एकपात्री अथवा कोणताही. ती झिंग, तो झुलवा कलाकाराला हवाहवासा वाटत असतो.

भेटायला आलेल्यांसोबत तो फोटोबिटो काढतो, बोलतो हसतोही पण खोल आत प्रयोगाची मंद घून गुंजत असते. आणि त्याचे पडसाद खोल आत उमटत असतात.

असो गोष्टी छोट्या आणि खूप वैयक्तिक असल्या तरी...

## ७. अक्का.

अक्का. नवऱ्याची मावसआत्या. वय पंचाहत्तर पार.

हाडे ठिसूळ झालेली. दोनतीन हॉस्पिटल वाऱ्या झालेल्या.

पुन्हा पडल्या. मेजर फ्रॅक्चर. मणक्याला मार बसलेला. ऑपरेशन अतिशय रिस्की. डॉक्टरांनी स्पष्ट सांगितले वाचण्याचा चान्स फिफ्टी फिफ्टी पर्सेंट आहे.

खूप खल झाला आणि ऑपरेशनला पर्याय नाही या निष्कर्षावर शिक्का मोर्तब झाले.

मी त्यांना सकाळचा चहा आणि नाश्ता देऊन मग ऑफिसला जात असे, नंतरचे जेवण वगैरे, जाऊ आणत असे.

अक्कांना चहा म्हणजे जीव कि प्राण. या चहासाठी त्या माझी अतिशय आतूर डोळयांनी वाट बघत आणि मी दिसले कि त्यांचे म्हातारे तरी बोलके डोळे चमकून उठत.

तर दुसऱ्या दिवशी ऑपरेशन ठरले. निर्णय रात्री उशिरा झाला म्हणून आम्हाला कळवले गेले नाही. मी नेहमी सारखी चहा नाश्ता घेऊन गेले. बाहेरच कळले कि आज त्यांना काहीच खायला प्यायला द्यायचे नाहीये. माझ्यासमोर धर्मसंकट उभे राहिले.

मी अक्कांच्या जवळ गेले. त्या मला लहान मुलागत म्हणाला, चहा देऊ नका म्हणाले ना डॉक्टर? अगं काही होत नाही, दे तू.

मी म्हंटलं " अक्का, तुम्हाला त्रास होईल, ऑपरेशनच्या आधी पोट पूर्ण रिकामे असणे आवश्यक असते.

अक्का अजीजीने म्हणाला " अर्धा कप, बरं निदान घोटभर तरी दे गं, डॉक्टरना सांगू नको "

माझा जीव कालवला, कारण त्यांची चहाबद्दलची आत्यंतिक ओढ मला ठावूक होती. एखाद्या गोष्टी बद्दलची तीव्र ओढ ज्याने अनुभवली त्यालाच कळावी.

मी परोपरीने त्यांना सांगत राहिले कि असे करता येणार नाही.

शेवटी तर त्या म्हणाला, बरं एक बोटभर चहा चाटव तरी, तेवढ्यावर समाधान मानेन.

त्यांना कसेबसे समजावले, म्हंटले आज संध्याकाळी मी ऑफिस मधून लौकर येईन आणि येताना तुमच्यासाठी आल्याचा मस्त दोन कप चहा आणेन बस!

त्या कसनुसं हसल्या, मी ऑफिसला गेले. पण दिवसभर डॉक्टरांचे शब्द डोक्यात पिंगा घालत होते. " वाचण्याचा चान्स फिफ्टी फिफ्टी पर्सेंट आहे. "

जर, त्या फिफ्टी पर्सेंट मधल्या अभद्र टक्क्याने बाजी मारली, संध्याकाळी अक्का दिसल्याच नाहीत तर!

शब्दात सांगू शकत नाही मी या 'जर'च्या शक्यतेने माझा पूर्ण दिवस केवढा आणि कसा ग्रासून टाकला. माझ्या डोळयात वरचेवर पाणी दाटत राहिले, एखाद थेंब चालला असता वाटत राहिलं. जर अक्का गेल्या तर घोटभर चहासाठी तडफडणारा तो जीव मला कधीच माफ करणार नाही.

अक्कांचे ऑपरेशन सक्सेसफुल झाले. पुढचे सांगण्यात तेवढा थरार नाही.

फक्त चहा न मिळाल्यामुळे कासावीस झालेला तो चेहरा आणि एरव्ही ज्या पिंगट डोळयांचा आम्ही हेवा करत असू ते त्या दिवशी मात्र रडवे झालेले बाळाचे डोळे जसेच्या तसे आठवत राहतात.

# *८ आयुष्याचे गुंते*

खूप गुंता होतो. सोडवायला जावं तर आणखी आणखी गाठी, अगदी बारीक बारीक गाठी पडत जातात चिमटीत सुद्धा न येतीलशा.

शेवटचं टोक सापडतंय सं वाटतं... पण अहं.

थकून जायला होतं. अशा वेळी मी एक करते.

सगळं गुंडाळून बाजूला ठेवते. डोळे मिटून शांत बसते. जुना पट लख्ख करते आणि मग नव्यानं सगळं सोडवायला घेते.

आश्चर्यकारक रित्या सहज सुटून जातं सगळं. अगदी हवं ते टोक आबाद हातात येतं. एकदा का हे टोक सापडलं कि मग चार बोटांमध्ये किंचित जागा सोडून त्यावर पोकळ पोकळ गुंडाळत जाते. छान मऊसूत गुंडा तयार होतो. अगदी मनाजोगता.

होतं ना असं बरेचदा.

होय मी लोकरीच्या गुंत्याबद्दलच तर बोलतीये. आणि कशाशी साधर्म्य वाटतंय?

खरंय किती गोष्टी एकमेकांशी समांतर चालत असतात नाही! म्हणायला गोष्टी आणि प्रसंग निराळे. ठिकाण आणि माणसं निराळी. पण उत्तरं मात्र खूप सारखी.

तेव्हा गाठी पडतायत जाणवलं कि एक करायचं, ती गाठ आणखीघट्ट होऊ नये याची खबरदारी घ्यायची. हलकी गाठ असेल तर किंचित स्पेस मिळते आणि सुटायचा सोडवायचा रस्ता सुद्धा. आणि हि स्पेस पटकन टिपायची.

हाच गुंता सोडवल्यावर किंचित दूर जाऊन सहज नजरेनं बघायचं. आपणच आपल्याला शाबासकी द्यायची. म्हणायचं " आह, एवढं सोपं होतं तर सगळं! उगीच गुंतलो होतो एवढं!

गोष्टी छोट्या असतात आणि खूप समांतर चालणाऱ्या..

## ९. अदृश्य छडी

स्वयंपाकघरातलं सामान नेहमी भरलेलं असतं. कडी-कोपऱ्यातील धूळ नियमाने पुसली जाते.

घरकामाच्या बायका आणि अन्य सेवा देणाऱ्या व्यक्तींची तंत्रं, बरोब्बर सांभाळली जातात. त्यांच्या मनातलं ऐकलं जातं, जोडीला बसवून खाऊपिऊ घातलं जातं.

घरातल्या मंडळींना वेळच्या वेळी चौरस नाश्ते-जेवण काळजीपूर्वक दिलं जातं.

सोमवारी बोळे करून टाकलेले कपडे, मोज्यांच्या गुंडाळया, अर्धवट दुमडलेल्या विजारी, हात फोल्ड असलेले शर्ट, मंगळवारी निगुतीनं स्वच्छ धुवून, बुधवारी इस्त्री करून, हॅंगरवर आलेले असतात.

डीटरजंट पावडरच्या डब्याची पातळी, शॅम्पू टूथपेस्टचा स्टॉक, नेहमी मेंटेण्ड ठेवली जातात.

शिळयापाक्या अन्नाची विल्हेवाट लावली जाते, दुधादह्याची किचकट कामं, नेटकी पार पडली जातात.

रात्री सिंकमध्ये अशीच टाकलेली खरकटी भांडी, अगदी बाईसाठी असली तरीही, सकाळी स्वच्छ धुवून, एकात एक रचून ठेवलेली असतात.

निरनिराळ्या बिलांच्या तारखा, कोणाकोणाचे वाढदिवस, आणि आठवणीत ठेवायचे दिवस, हे सगळं, कॅलेंडरवर आठवणीनं नोंदवलेलं असतं आणि ते तेवढ्याच नेमस्तपणे पाळलंही जातं

आला-गेला, पै-पाहुणा, घर-दार, ऑफिस-लोकल , सगळं तंत्र सांभाळलं जातं.

कितीही दमून घरी आलं तरी घरातल्या लहानग्यांच्या दिवसाभरातल्या घडामोडी मनापासून ऐकल्या जातात, त्यावर उत्तरं किंवा समाधानकारक प्रतिक्रिया दिल्या जातात.

घरातल्या आजारी किंवा ज्येष्ठ जीवाचं सगळं, न थकता न कुरकुरता उरकून, मग कोणीतरी दिवा मालवतं. कोणाच्या लक्षातही येत नाही. एक जादूची छडी अव्याहत फिरत असते घरभर. तिचा अजिबात आवाज येत नाही मात्र वावर जाणवत असतो. फक्त त्या छडीला, अर्थात सगळया धबडग्यातून, स्वतःकडे बघायला वेळ झालाच तर. छडीला वय नसतं, नाव किंवा जात-धर्म नसतो. तिचा धर्म असतो अव्याहत फिरण्याचा.

आणि अचानक कोणीतरी म्हणतं " त्यात काय एवढं, भांडयाधुण्याला बाई तर आहे " किंवा " झेपत नसेल तर गोष्टी बाजारातून आण "

फिरणारी छडी क्षणभर थबकते, छडी धरलेले हात एकमेकांकडे करुणापूर्ण आश्चर्याने बघू लागतात.

" म्हणजे हा जो काही चालला होता तो खुळेपणाच होता कि काय! ज्या प्रमाणे रोबो कामं करत असला तरी ती त्याला फीड करावी लागतात, तसंच पगारी बाई कडून सगळं करून घ्यावं लागतं आणि फक्त धुणीभांडी म्हणजे का घर असतं? गाण्याच्या स्वरांमधल्या श्रुतींसारख्या किती सूक्ष्म जागा असतात जीवनात किंवा, पुस्तकाच्या छापील ओळींमध्ये कितीकाही बिटवीन द लाईन्स पेरलेलं. हेच न लिहिलेलं वाचावं लागतं, भिनवावं लागतं " वगैरे वगैरे बरंच येतं छडीच्या मनात. पण ते मनातच राहतं, कारण कोणी कोणाला स्पष्टीकरणं देण्याघेण्याची कोणालाच अपेक्षा नसते. "हं.... भांड्याधुण्याला, वरकामाला बाई तर आहे ". बोचरे शब्द पुन्हा घुमतात. घुमत राहतात. छडीला डोळे नसले तरीही दोन थेंब ओघळून जातातच जातात.

मात्र सकाळ होते, एक चक्र पुन्हा सुरु होतं... स्वयंपाकघरात सामान भरलेलं असतं पासून पुन्हा नव्याने.

## *१०. मान अपमान छोटे तरी मोठे.*

गवार कशी दिली रे?

वीसला पाव

पाव किलो दे.

भाजीवाल्यानं गवार तोलली, बाईंच्या पिशवीत घातली. बाईनं भाजीवाल्याकडे न बघता आणि अजिबात न वाकता दहाच्या दोन नोटा भाजीवाल्याच्या परडीत भिरकावल्या. भाजीवाल्यानं एक नजर बाईंकडे टाकली पण बाई भुर्कन निघूनही गेली. गरीब डोळ्यात अपमान उमटला, क्षणभर. पण लगेच गिळला गेला.

भलं मोठं क्रॉसिंग. अमुक मिनिटाच्या आत पोहोचायचं टास्क. डॉमिनो पिझ्झाचा डब्बा खडखडवत तरुण डिलिव्हरी बॉय बाईक वरून सुसाट निघालेला. वेळेच्या आत पोहोचला तर त्याला कसले कसले पॉईंट्स मिळणार असतात. आणि रस्ता क्रॉस करायला एक आजीबाई थांबलेल्या. आजीबाईना क्रॉसिंग झेपेना. त्या दोन पावलं पुढे आणि चार पावलं मागे करतायत. डॉमिनो तरुणाने गाडी स्लो करत थांबवतो. लेट झाला, हरकत नाही, तो किंचित वाकतो, हात वाऱ्यावर लहरीसारखा हलवत हसतो आणि आज्जीना " आधी तुम्ही जा " ची खूण करतो. तो थांबल्यामुळे त्याच्या मागची दोनचार वाहनं थांबतात. आजी निर्विघ्नपणे रस्ता ओलांडतात. कदाचित मनातल्या मनात तरुणाला आशीर्वाद देतात " सुखी रहा "

आजीच्या चेहऱ्यावर समाधानाचं सुरक्षिततेचं हसू. तरुणाच्या चहेऱ्यावर कुछ पानेकी ख़ुशी.

फक्त पाच मिनिटाच्या फरकाने उमटलेले तरंग.

काय करावं. आधीच्या प्रसंगानं दुख्खी व्हावं चिडावं कि अजून पूर्ण काळोख झाला नाही म्हणून मनाला दिलासा द्यावा!

दिलासाच द्यावा नाही का! सकारात्मकता जमेल तेवढी जमेल तिथे जमेल तशी.

गोष्टी छोट्या असल्या तरी.... करेक्ट, दिल बहलाने या दिल दहलाने वाल्या.

## ११. ओला आणि ओलावा.

छोट्या म्हणजे खूपच छोट्या असतात गोष्टी.

ओला बुक केली. सात मिनिटं लागतील असं फोन दाखवत होता. गाडीपर्यंत सोडायला पुतणी आली होती. गाडी आली आम्ही बसलो.

नवरा गाडीवाल्याला विचारता झाला "ट्राफिक भरपूर होता वाटतं "

"नहीं आज सुबहसे गाडी चला रहा हूँ। बाथरूम भी जानेको टाईम नहीं मिला। इसलिए अभी सब निपटाके हाथ मुँह धोकरके फिर आया इसलिए थोड़ी देर हुई। "

पहिली सिंगल धाव काढली पठ्ठ्यानं. खरंतर " हो ट्राफिक होता " असं तो सहज सांगू शकला असता. पण त्यानं खरं कारण सांगून टाकलं. गाडी निघाली.

बरेचदा हे गाडीवाले नाकासमोर बघून गाडी चालवत राहतात, त्यांना तशी शिकवण असते म्हणे आणि पॅसेंजर्सना सुद्धा फार प्रश्न विचारलेले आवडत नाहीत हेही तेवढंच खरं. पण यानं स्वतः संभाषण सुरु केलं.

कोणत्या ट्रेननं जाणार तुम्ही?

दुरांतो.

हो पण त्याला तर अजून जवळ जवळ दीड तास आहे.

हो पण आम्हाला सवय आहे तासभर आधी जाऊन बसायची.

हं, ये तो बहोत अच्छी आदत है। काश हरकोई ऐसा करता। ( दोन धावा )

पुन्हा काही क्षण गेले।

नवरा म्हणाला " अब आगे मेरा बैंक आएगा”

“नहीं सरजी, हम पहलेही राईट ले चुके है, रिज़र्व बैंक और आगे वाले रास्ते पे है”

अरेच्चा, याला कसं कळलं मी रिझर्व्ह बँकेत आहे. त्यावर त्याने त्याही पुढे स्टेट बँक आहे, वगैरे संबंधित माहिती दिली. कॉमन सेन्सवर त्याने आणखी तीन धावा धावून काढल्या.

आपकी ट्रेनको बहोत समय है, क्या आपको कुछ चायनाश्ता करना है? तो हम गाड़ी वैसे रोक सकते है, आप संकोच ना करें।

नाही नाही आम्ही व्यवस्थित पोटभर खाऊन निघालोय. (त्याच्या विचारण्यात टिपिकल मार्केटिंगवाला खोटा ओलावा किंवा कृत्रिम शब्द नव्हते)

मग जनरल गप्पा, रस्ते, मेट्रो, ट्राफिक वगैरे.

स्टेशन जवळ येत होतं.

क्या बेटीके घर आये थे? (त्याचा आवाज एकदम मित्राचा किंवा घरच्या सदस्यासारखा वाटला )

नहीं, एक फंक्शन था। रिश्तेदारके घर गये थे.

मुझे लगा आपकी बेटी थी। (ओहो आम्हाला गाडीपर्यंत सोडायला आलेली पुतणी बघून पठ्ठ्यानं हा अंदाज बांधून टाकला)

हमारी भतीजी है, बेटीके बराबरकी ही है।

आणि स्टेशन आलं. आम्ही उतरणार, तर हा म्हणाला उत्तरीएगा नहीं, बिल पुरा करते है फिर उतरीये.

बिल झालं. हा पठ्ठ्या पटकन उतरून आला. शोफर सारखं दार उघडून अदबीने उभा. संकोचच वाटला पण जोडीला खूप जास्त प्रेम आदर. छान सोफेस्टिकेशन. दिखावा म्हणून नाही अगदी सहज वागणं. सहज सुंदर बोलणं. आम्हाला बाजूला करत डिकीमधून सामान काढून दिलं.

नवरा : कितने बजे तक गाडी चलाते हो?

मैं रोज नहीं चलाता। सैटरडे सन्डे चलाता हूँ।

और बाकी दिन?

बाकी दिन ड्रायव्हर चलाता है. क्योंकि मैं जॉब करता हूँ। ग्रॅज्युएट हुं. छुट्टीके दिन गाड़ी चलाता हूँ, ड्रायव्हरका पैसा बच जाता है न!

आणि तो छान हसला.

अरे हा तर आलेला प्रत्येक चेंडू टोलवत चालला होता. तेही बाऊंड्री बाहेर. किती गोड, किती खरं असावं एखाद्यानं!

स्टेशनकडे जाताना आमचे दोघांचे चेहरे प्रसन्न हसरे होते.

कोणीच काही विशेष केलं नव्हतं, काही दिलं नव्हतं घेतलं नव्हतं तरीही.

उतरल्यावर त्याला म्हंटलं " मॅक्झिमम पाचच स्टार देता येतात म्हणून नाहीतर तुला खूप खूप स्टार्स दिले असते लेकिन पांच स्टार तो पक्का "

भारी रे मित्रा. पुन्हा एक हसरं हसू.

पण हो कि, त्याला हे सांगायचं राहूनच गेलं.... हेच कि गोष्टी छोट्या असतात पण खूप मस्त करून जाणाऱ्या. अर्थात तो स्वतः हे जगतोयच कि!

आणि हे असलं काही सांगितलं कि आई विचारते, तुलाच गं कशी नेहमी चांगली माणसं भेटतात? किंवा तुला नेहमी चांगलीच माणसं कशी गं भेटतात?

मजेमजेची गंमत आणि काय! आपले चष्मे स्वच्छ ठेवले कि दुनिया सुद्धा मस्त दिसते.

---

## १२ जिथे तिथे मानसशास्त्र.

कोणी काही देत नसतो कोणी काही मागत नसतो तरी सुंदर देवघेव चालूच असते.

शिवायला दिलेला कपडा घ्यायला टेलरकडे थांबले होते. चाळीशीची एक बाई दोनतीन पिशव्या घेऊन आली. दोनचार श्वास घेतले शांत झाली. कौंटरवाल्या माणसाला म्हणाली " कैसे हो?"

मै अच्छा हूँ.

कितने सालके बाद आई ना मैं?

( माणूस ब्लँक ) ( खूप वर्दळीच्या उपनगरात स्टेशन जवळचं त्याचं दुकान. दिवसाला गेला बाजार पाचदहा वीस गिऱ्हाईक येणारं जाणारं. )

पुssssरे पांच सालके बाद आई मैं। ( चेहऱ्यावर बालसुलभ स्माईल )

हां हां, बहोत साल हो गए।

अभी उधरही सेटल हो गई ना।

हां, आप उधर जाने वाली थी ना? ( त्याला लक्षात असण्याची शक्यता अगदीच विरळ, तरी त्याने बिन संदर्भाचं एक वाक्य सोडून दिलं )

हां, मैं दुबई में सेटल हो गई। ( बाई ने त्याच्या मनातलं प्रश्नचिन्ह पुसून टाकायला मदत केली किंवा जणू त्याला तिच्या आयुष्यातल्या सगळया घडामोडी पूर्ण ठाऊक असल्याच्या भाबड्या समजात ती बोलली )

अच्छा अच्छा... हां हां, दुबई दुबई. बहोत अच्छा. ये तो बहोत मस्त हो गया. ( त्याला दुसरी तीन गिऱ्हाइकं पण बघायची होती )

वो क्या हुवा की पिछले साल डैडी को स्ट्रोक आ गया।

अरे बाप रे!

और अभी दो महीने पहले वो एक्सपायर हो गए।

(पुन्हा एकदा ) अरे बाप रे, ये तो बहोत बुरा हुवा। (सिम्पथीचं बाळकडू प्यालेला तो उत्तरला)

फिर मैं मम्मी को भी उधर लेके गई।

हाँ, ये बहोत अच्छा किया। ( त्याच्या डोक्यात खरंतर कोणाच्या कपड्यांची डिलिव्हरी नेमकी आज व्हायला हवी, कोणाची उद्या परवा वगैरे याची गणितं चालू )

अभी इधर पंधरा दिनके लिए आई हुं, तो बोला चलो ये साड़ी वाड़ी का काम खतम करते है।

हां हां, बोलीये ना भाभीजी.

तिने झगरी मगरी टिकल्या टुपल्या वाल्या चारपाच  साड्या त्याच्या समोर ठेवत कशाचं काय करायचं ते सांगायला सुरुवात केली.

आता माझ्यातल्या प्रेक्षकांचं काम संपलं होतं आणि समोर निव्वळ व्यवहार सुरु झाला होता.

हा सगळा प्रसंग वरकरणी निरस वाटला तरी प्रत्येक माणसासोबत, प्रत्येक प्रसंगासोबत केवढं मानसशास्त्र गुंतलेलं असतं ते बघणं मजेचं असतं.

त्या अत्यंत बिझी टेलर बुवाला त्या बाईची किंचितही ओळख पटलेली नसूनही एवढा मोठा संवाद त्यानं पुढे रेटून नेला. स्वतःवर प्रेम करणाऱ्या माणसांना इतरांच्या नजरेत सुद्धा आपण खूप हवे असल्याचा भाव असतो हे त्या बाईंनी चार वाक्यात दाखवून दिलं. त्या बाईच्या बोलण्यात कोणताही दांभिकपणा नव्हता किंवा आपलं काम झटपट करून घेण्याची क्लुप्ती वगैरेही नाही.

समाजात वावरताना हे असे छोटे प्रसंग न्याहाळणं आणि त्यात खोल दडलेले अर्थ जाणून घेण्याचा प्रयत्न करणं रंजक असतं.

बाकी गोष्टी छोट्या दिसल्या तरी छोट्या नसतात तर खूप इंटरेस्टिंग असतात, अर्थात त्यात खोल उतरलो तर!

## *१३. आठवणी.*

कोणकोण कुठे कुठे आठवत राहतात.

काकडी एकसारखी बारीक चोचवताना ताई आत्या आठवते. अतिशय काटकसरीचा तरीही नेटका संसार करणारी आत्या नेहमी भांडं बंद गॅसवर ठेवून नंतर गॅसला लायटर लावायची. अक्षरशः दोनतीन सेकंदाचा गॅस सुद्धा वाया जाऊ नये. अगदी साधं रोजच्या स्वयंपाकात गॅस पेटवताना आत्या आठवतेच आठवते. आत्याच्या किती किती गोष्टी तेव्हा न कळलेल्या पण आज आदर्श वाटणाऱ्या.

सायीचं विरजण लावताना मामा आठवतो. दूध दुभत्यात वाढलेला मामा. मामी गेल्यावर एकटा राहणारा ८२ वर्षाचा मामा. त्याला एकदा विचारलं दुधाच्या सायीचं काय करतोस रे तू. तो म्हणाला शिस्तीत विरजण लावून पुढे लोणी तूप सगळं व्यवस्थित करतो.

डोसे पसरवताना मावशी आठवते. आम्ही शाळकरी वयात असताना आणि हॉटेलच्या खाण्याशी पूर्ण अनोळख असताना मावशीकडे केलेले तलम मोठे डोसे आणि सोबत बटाट्याची भाजी. हिरवी मिरची, उडीद डाळीची फोडणी आणि लांबट मऊ कांदा वाली ओलसर फिकट पिवळया रंगाची ती भाजी एवढ्या वर्षांनंतर सुद्धा तशीच आठवते.

फणस म्हणजे नागावच्या मावश्या. तो पसारा आणि आमचं मुलांचं अधाशासारखं गरे गट्टम करणं.

फेसाळलेलं दूध म्हणजे विजुमामा. भाचीला लपून छपून गोठ्यात घेऊन जाऊन म्हशीचं ताजं फेसाळ दूध प्यायला देऊन नंतर तिच्या ओठावर आलेली मजेदार मिशी पुसून देणारा मामा. आज सत्तरी ओलांडलेला. थकलेला मामा.

आज असलेली ८४ वर्षाची आई आणि नसलेला तरी सतत सोबत असलेला बाबा तर दिवसात पन्नास वेळा स्पर्शून जातात.

मोठ्या चौकडीची ठसठशीत काठापदराची भरड सुती साडी आणि नागावची आजी हे एवढे एकात एक मिसळलेले कि बिंब प्रतिबिंब. आजीच्या शेवटच्या दिवसात ती मला म्हणाली होती. आता नोकरीला जायला लागलीस मं पातळं नेसावी लागतील ना. बाळंतिणीच्या

खोलीतल्या पेटीतली तुला हवी ती पातळं घेऊन जा. आज हे आठवलं तरी गलबलतं. आजीची ती नऊवार लुगडी त्याचा स्पर्श सुगंध आणि त्यातल्या भावना. नंतर नेईन म्हणून त्या वेळी न नेलेली लुगडी. आह.... आज सोबत असती तर! कधीही ठळक चौकडीचं लुगडं दिसलं कि काळाचा आस तीस बत्तीस वर्ष उलटा फिरतो.

मध्ये म्हंटलं त्याप्रमाणे धाकट्या काकाच्या हाताची बोटं बघते आणि थेट बाबाचा हात आठवतो. डोळे मिटते आणि तो स्पर्श उमलवत राहते.

रस्त्यावरून शेजारून जाणारी अँब्युलन्स बघते आणि आठवते मामी. अँब्युलन्स मधेच शेवटचा श्वास घेतलेली. हॉस्पिटल पर्यंत न पोहोचू शकलेली मामी. सायरनचा आवाज ऐकला कि डोळ्यासमोर येते शेवटच्या श्वासासाठी धडपडणारी तडफडणारी मामी. आणि मग झाकोळल्या नजरेला काही दिसेनासं होऊन जातं. नजरभर फक्त ओल दाटून येते.

अशा किती किती नाजूक आठवणींनी कधी जीवघेण्या स्मृतींनी आपल्या मनाचे कप्पे गच्च व्यापलेले असतात. रोज अगदी रोज त्या त्या ठिकाणी त्या त्या कृती करताना जणू हे सगळे सोयरे आसपास असावेत असं वाटत राहतं. काळ जणू गोठवून ठेवलेला असतो आपण. आणि काळाचं लबाड घड्याळ झपकन पुढे झपकन मागे होत राहतं. सुखवत राहतं तेवढंच दुखवतही राहतं. यालाच जगणं म्हणत असावे बहुतेक.

बाकी गोष्टी म्हंटल्या तर छोट्या पण खूप गहन असतात.

## *१४ छोटे ग्राहक मोठं प्रेम.*

तर माझी बँक आणि बँकेतली माणसं. आमचे खातेधारक. नेहमीच्या चक्राप्रमाणे माझी दुसऱ्या ब्रांचला बदली झाली.

नव्या ब्रांचला रुजू झाले. काही महिने सरले. त्या दिवशी ऑफिसमधून येत होते. सिग्नलला क्रॉसिंगसाठी थांबले. एक सायकल शेजारी थांबली, बघते तर आधीच्या ब्रांचला काहीबाही खायचं आणून देणारा, एका हॉटेलचा डिलिव्हरी बॉय आणि अर्थातच आमचा लो रिस्क कस्टमर.

कैसी हो मैडम ?

मैं अच्छी हूँ.

मैडम  आप दुसरी जगा गयी ना?

हां, अब स्टेशनके ऊस तरफ वाली शाखामे गई. तुम्हारा खाता चालू है ना अभीभी?

बिलकुल चालू है मैडम. मै पिछले हफ्ते बँकमें गया था, मै आपके लिये देख रहा था, आप काफी दिनोसे दिखी नही तो मैने दुसरी मेडमसे पुछा, उन्होने बताया आप दुसरी वाली शाखामे गयी हो.

मी हसले. और बताओ. बाकी सब ठीकठाक?

चार शब्दांची देवाणघेवाण झाली, सायकलला टांग मारून तो गेला.

मी दोन पायाच्या वाहनाने निघाले, खूप छान वाटत होते. "मै आपके लिये देख रहा था " एक वाक्य मला किती श्रीमंत करून गेलं. खूप छान वाटलं. समाधान वाटलं. छोट्या ग्राहकांच्या छोट्या गोष्टीसुद्धा त्यांच्यासाठी मोठ्या असतात आणि हे परिमाण ओळखणं बँकरचं कर्तव्य आहे.

साधारणतः कोणत्याही सेवा क्षेत्रात हाय प्रोफाईलच्या मागे धावण्याची अजब रीत असते. हे असं धावल्यानंतर तोंडावर वाहवा मिळतेही पण हेच वाहवा करणारे एवढ्याश्या गोष्टीचं भांडवल करून त्याच माणसाला किंवा संस्थेला धुळीस सुद्धा मिळवायला कमी करत

नाहीत. शंभर गोष्टी बरोबर केल्याचं कौतुक नसेल पण त्यानंतर एखाद गोष्ट किंचित इकडेतिकडे झाली तर तुमचे वाभाडे निघू शकतात किंवा टारगेटचे गाजर विरले किंवा आपले उद्दीष्ट्य साध्य झाले कि स्तुती करणारा आणि करवून घेणारा दोघे दोन दिशांना जातात जे आयुष्यात पुन्हा कधी एकमेकांची आठवणही काढत नाहीत आणि या पार्श्वभूमीवर वाटतं अनेक वर्षांनंतर भेटणारे हे असे वाटेत भेटून आवर्जून चौकशी करणारे छोटे / लो प्रोफाईल दोस्त आपली खरी कमाई आहे. क्वचित ते आमच्या लक्षात नसतीलही पण आपण त्यांच्या लक्षात असतो हे आपलं संचित.

आयुष्य मस्त व्हायला आणखी काय लागतं, हे असे छोटे छोटे क्षणच तर आयुष्य मस्त करतात..... हं!

## *१५ कूपीतून आणावा सुगंध.*

ऊन वारा पाऊस पक्षी वेड्यागत आवडणारे ते दोघे. संगीत शब्द मन भावना समजणारे ते दोघे. न बोलताही बरंच काही बोलणारे ते दोघे. कुठेही जायचं झालं तर एकसाथ जाणारे ते दोघे. पण त्या दिवशी बायकोला जास्तीचं काम निघालं आणि तो एकटाच गेला. खरंतर जायचं नव्हतं तरी गेला.

एवढंसं तोंड करून गेला, किंचित नाराजीनंच. गेला आणि आला.

एरव्ही वाचन आवडत असलं किंवा प्रचंड वाचन असलं तरी बोलता चालताना साहित्यिक भाषा आणि उपमा अलंकारांशी फारसं सख्य नसलेला तो. फारसं कवी टाईपचं वगैरे न बोलणारा तो .

पण त्या दिवशी मात्र तिथलं, तिथल्या मातीचं, निसर्गाच्या रूपांचं आणि एकूणच सगळ्या जिवंतपणाचं वर्णन करून थकला आणि शेवटी म्हणाला " खरं सांगू तू असायलाच हवं होतंस तिथे.

"हं? ".

" एक सांगू, तिथून येताना काय वाटलं?"

" काय वाटलं? "

" वाटलं.... मातीचा, फुलापानांचा, शेणगोठ्याचा, हवेचासुद्धा सुगंध बंद करून कशात तरी भरून आणता आला असता तर खूप सारा भरून आणला असता......तुझ्यासाठी."

आह, ती पाणी पाणी.

हाय रामा... काय करावं अशा खुळ्यांचं! अरे ते आय लव्ह यु वगैरे कुठे कधी म्हटलंय आपण एकमेकांना पण हे... हे आय लव्ह यु च्या लाखपट सरस रे!

गोष्टी छोट्या पण खूप जिवंत रसरशीत असतात.. असतात ना!

## *१६. बदलत्या वयाचे निकष निराळे.*

रोजचा मॉर्निंग वॉक आणि भेटणारी निरनिराळ्या स्वभावाची वयाची, निरनिराळ्या सामाजिक स्तरातील माणसं. त्यांना न्याहाळणं, माणूस वाचणं हा सुद्धा रोजचा परिपाठ. कधी निखळ आनंद तर कधी उदास अवकाश देणारे क्षण .

सहज जाताजाता एखाद वाक्य कानावर पडतं आणि अस्वस्थ करून जातं. विचार करण्यास उद्युक्त करून जातं.

त्या दिवशी शेजारून दोन आजोबा चालले होते. सत्तरीच्या आसपासचे असावेत.

एक आजोबा म्हणाले " बापट दोनतीन दिवसांपासून येत नाहीये ना रे?"

दुसरे आजोबा क्षणाचाही विलंब न लावता म्हणाले "तीन नव्हे फक्त दोन दिवस झालेत"

अक्षरशः क्षणाचाही विलंब न लावता ते उद्गारले. कोणतासा धागा कसली अखंड टिकटिक त्यांच्या मनात चालू असेल का? त्या धाग्याचं बोट धरत दोघांच्या मनात अशुभाची सावली क्षणार्धात सरकून गेली असेल का? नेमकं त्या क्षणी त्या दोघांना काय वाटत असेल? एरव्ही दोनतीन दिवस हा प्रयोग किती सहज होऊन जातो मग इथे उल्लेख झालेला तो तिसरा दिवस सुद्धा आजोबांना नकोसा का झाला असावा?

वय वाढत जातं तसं ते घट्ट धरून ठेवण्याची धडपड सुरु होत असावी का?

एवढ्या मोठ्या आयुष्यात दिवस महिने वर्ष सरसर सरून गेल्या नंतर आता उरलेल्या आयुष्यातला प्रत्येक क्षण गाठी बांधून जवळ धरून ठेवावा वाटत असेल का?

वास्तविक वरकरणी अगदी साधं वाटणारं वाक्य " बापट दोनतीन दिवसांपासून येत नाहीये ना रे " दुसऱ्या आजोबांनी ' दोन दिवस ' या शब्दांवर भर देत सुधारून घेतलं नसतं.. जणू बापटांचा आयुष्यातला एक अख्खा दिवस त्यातले चोवीस तास गुणिले साठ आणि आणखी एकदा साठ एवढा मोठ्ठा काळ ते सहजासहजी हाताचा जाऊ देऊ इच्छित नव्हते.

गोष्टी छोट्या असल्या तरी मनावर कोरल्या जाणाऱ्या, विचारप्रवृत्त करणाऱ्या असतात.

## *१७ सहजीवन आणि सकारात्मकता.*

गद्रे काकांच्या घराच्या टाईल्स आणि जिने बघायला गेलो, तसं काम आमच्या घरात करून घ्यायचं होतं.

नाशिक. सहजीवन....... सुंदर शांत बंगल्यांची कॉलनी. शांत पण आतून खूप एकटी एकाकी.

एवढा मोठा बंगला आणि राहणारी माणसं दोन. काका काकू वय पंचाहत्तर वगैरे. आम्ही फक्त, येतो असा निरोप दिला होता. गेलो. आमचं काम केलं. काकांना येववत नव्हतं तरी टेरेस मध्ये काय काय काम करून घेतलं तेही दोनदा जिने चढउतर करून दाखवलं. टेरेसचं कुलूप लावताना त्यांचा हात थरथरत होता, म्हंटलं " बाबा द्या मी लावते "

अगं राहूदे. मी लावतो.

पुन्हा दुसरी दारं लावताना तेच. राहू दे मी लावतो, थांब मी करतो. जणू त्या घराचा एक एक कोपरा त्यांच्या स्पर्शासाठी खोळंबलेला असावा.

खाली आलो,

" आता जेवायच्या टेबलावरच या " काकूंनी फर्मान सोडलं

. "अहो नाही, तिकडे भावाकडे जेवायचं सांगून आलोय. "

" तुम्ही नेहमी धावत येता नि पळत जाता, जेवायला तर कधीच येत नाही तेव्हा आता एक नाही नि दोन नाही. बसा टेबलावर. "

काका तिथेच शेजारी बसून मृदू नजरेने हा सोहळा बघत होते.

अप्रतिम भरीत, भाकऱ्या, लोणी तूप चटण्या समोर ठेवलेल्या. आणि मग श्रीखंडाचा हाsss एवढा आग्रह. कसं अनमान करणार आणि पदार्थांपेक्षा त्यातलं प्रेम, कधीतरी घरी येणाऱ्या पावलांचे स्वागत, त्यांना बांधून ठेवण्याची आस.

काका खूपच दमलेत, काकू नेटाने सगळं करतात. मग दोघांनी मिळून त्यांची बाग दाखवली, आणि बरंच काय काय कौतुक हौसेने सांगितलं. जुन्या आठवणी वगैरे.

आता सुट्ट्यांमध्ये लेकींना नातवंडांना बोलावलंय म्हणाले आणि नातवंडांसाठी कायकाय करायचं याचे प्लान्स.

बाकी नेहमीचं चित्र. आसपासच्या बंगल्यातले लोक शहर किंवा जग सोडून गेलेले, आलेल्या नव्या पिढीला जुन्यांमध्ये फारसं स्वारस्य नाही.

खरंतर ज्यांना शक्य आहे त्यांनी अशा काका मामांकडे अधून मधून जायला हवं. माणसं बोलून दाखवत नाहीत, पण माणूस दिसत नाही, बोलायला कोणी नाही, खायला केलं तर प्रेमाने ज्यांना खाऊ घालावं असं जवळचं कोणी नाही हि खंत प्रत्येक कृतीमधून शब्दामधून दिसत होती.

काकुंचं भरीत भाकरी मुळात चवदार, पण जेव्हा काका काकू तिथेच शेजारी बसून चक्क वाढत होते, आतून वस्तू आणून आणून आग्रहाने खाऊ घालत होते तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडून वाहणारा आनंद केवळ कोवळा मुलायम, डोळयात पाणी आणणारा.

थांब ग तू बस, मी आणते लोणचं, म्हणत आत जाणाऱ्या काकूंना मग मी मुद्दामच नाही थांबवलं. कारण ते स्वतः केलेलं लोणचं स्वतःच्या हातांनी वाढतानाचा त्यांच्या डोळयातला आनंद मला बघायचा होता.

पुन्हा निघताना पन्नास वेळा त्यांचं निरोप घेणं आणि माझं पन्नास वेळा " बाबा, सावकाश उतरा "

सगळंच हवंसं.

तेही काहीतरी मिस करत असतात, आपणही काहीतरी मिस करत असतो.

फक्त या मिसिंगची जाणीव झाली पाहिजे आणि मेळ बसला पाहिजे.

तर हि दोन वर्षांपूर्वीची गोष्ट. मागच्या वर्षी काका (बाबा) गेले. काळ आपल्या गतीनं पुढे सरकायचाच.

आणि आज मात्र काकूंच्या नव्या जगण्याची हेल्दी गोष्ट या पुढची.

काकूंचा नातू आमच्या कडे मुंबईला आला होता. आम्ही जेवत होतो. आणि काकूंचा फोन " आशिष अरे डीपी कसा बदलायचा मला सांग बरं "

"आजी मी तिकडे नासिकला आलो कि सांगतो. "

" बरं ठीके पण ते ओला बुक करायचं शिकव बरं का आधी. "

"अगं आजी, मी रविवारी येतोय ना तिकडे, मग सांगेन सगळं तुला. "

" नक्की सांग, अरे आशू ऐक ना, आता मला मेसेज पाठवता यायला लागले आणि हो फोटो पण टाकता यायला लागले बरं का "

" अरे व्वा छान छान. ते मला कळलं गं आजी, रोज उठलो कि पहिले तुझेच मेसेज दिसतात "

फोन स्पीकर वर असल्यामुळे आम्ही सगळेच हे संभाषण ऐकत होतो. हसत होतो. आशू म्हणजे माझा पुतण्या आणि त्याची आजी म्हणजे माझ्या जावेची आई. गद्रेकाकू वय पंचाहत्तरच्या आसपास.

परवा नाशिकला आमच्या तीन घरांच्या गणपतींचं सोमेश्वरला विसर्जन झालं आणि काकू म्हणाल्या आज माझ्यातर्फे पार्टी. मग काय चौदा पंधरा जणांची गँग उत्सव मध्ये जेवायला, मग आमच्या घरी गप्पांचा अड्डा, वामकुक्षी आणि संध्याकाळचा चहा. निघताना काकू म्हणाल्या " स्मिता तुझा व्हॉट्सऍप नंबर दे गं मला "

माझे दोन पुतणे म्हणाले " स्मिता काकू तू गेलीस आता कामातून "

काकू मस्त हसल्या "असू दे. मला आवडतं चांगले चांगले मेसेज सगळयांना पाठवायला"

काकू छान मॅचिंगचे ब्लाऊज आणि फ्रेश कलरच्या काठपदराच्या साड्या नेसतात. कधीही गचाळ गबाळ नसतात. हसतमुख.

त्यांना सगळयांकडे जायला आवडतं आणि तेवढंच दुसऱ्यांना आपल्याकडे बोलावायलाही आवडतं. छानछान करून खाऊ घालायला आवडतं.

वास्तविक सोमेश्वरला पायऱ्या चढता उतरताना त्यांना त्रास होत होता पण त्यांनी कुठेही शब्दांनी किंवा चेहऱ्यावरच्या भावांमधून ते दर्शवलं नाही.

बरेचदा सत्तरीतली माणसं, तेही पार्टनर गेल्यानंतर उदास, रडका स्टान्स घेतात. ( त्यांच्या तब्येतीच्या कुरबुरी असायच्या हे मान्य करूनही )आपलं दुखणं, नकारात्मकता दुसऱ्यांवर लादतात किंवा नको नकोचा नन्नाचा पाढा वाचतात.

या पार्श्वभूमीवर मला काकूंचं खूप कौतुक वाटतं. त्या लहान मुलाच्या उत्साहाने स्मार्ट फोन शिकल्या आणि छान वापरतायत. पुतण्या म्हणाला त्या प्रमाणे खरोखर आलेल्या मेसेजेस मधले निम्मे मेसेज काकूंचे असतात पण इरिटेट नाही होत. छान वाटतं. त्यातले बरेच रिपीट झालेले असतात काही फक्त छापील फॉरवर्ड असतात, त्यातले बरेचसे मी न वाचताच पुढे जाते. पण मुद्दा वेगळाच आहे. काकूंसारख्या व्यक्ती दुसऱ्यांना जगणं शिकवत असतात. ऊर्जा देत असतात.

जियो काकू. छान वाटतं तुम्हाला भेटून.

"पुढच्या वेळी नक्की घरी या गं " म्हणत निरोप घेणाऱ्या काकूंना मी सांगते "येणार काकू नक्की येणार तुमच्या घरी आणि भरभरून ऊर्जा घेऊन परतणार "

ऊर्जा काय, सकारात्मकता काय बाजारात मिळत नाहीत. हे सगळं आपल्या अगदी आसपास सांडलेलं असतं जे आपण फक्त टिपायचं असतं हळुवारपणे.

## *१८. छोटे ग्राहक नव्या नोटा*

मी बँकर. राज्यात किंवा राज्याबाहेरही फिरताना किंवा मुंबईबाहेर पडल्याबरोबर म्हंटलं तरी वावगं ठरू नये, पैशाची देवाणघेवाण करताना जुन्या नोटा चिंध्या फॉर्म मधे किंवा प्लास्टिक झीपलॉक मधून दिल्या घेतल्या जातात ते बघून मनस्वी दुःख होतं. बँकवाल्यांना प्रत्येक वेळी अगदी नव्या नोटाच मिळतील असं नाही पण चांगल्या किंवा देताघेताना छान वाटेल अशा नोटा नक्कीच मिळू शकतात. तर शक्य असेल तेव्हा तेव्हा तिथे तिथे मी नव्या कोऱ्या किंवा चांगल्या नोटा देते. थट्टा किंवा हसण्यासाठी अथवा मोठेपणा दाखवण्यासाठी हे लिहित नाहीये. नवी कोरी नोट देताना देणाऱ्याच्या चेहेऱ्यावर ख़ुशी पसरते आणि ती नोट घेणाऱ्याच्या चेहऱ्यावरची खुशी शतपट होऊन परत मिळते.

तीच गोष्ट ब्रांचमधे नव्या नोटा आल्यावर. आर्थिक दृष्टया गब्बर किंवा साहेबाच्या मर्जीतल्या ग्राहकांना एकेका व्यक्तीला दोन पाच लाखाची कोरी करंसी देण्यापेक्षा तेवढ्याच रकमेत गरीब किंवा छोट्या ग्राहकांना अगदी दोन दोन चार चार हजार सुद्धा ते ही न मागता दिल्यावर दोन्ही पक्षी फक्त ऊदंड समाधान सांडतं. आपण कोणीतरी देवदूत असल्यासारखे आभारदर्शक भाव समोरच्या डोळयात ऊमटतात. ज्यांच्या घरी रोजच 'दिवाळी' असते अशा मूठभर लोकांपेक्षा ज्यांना त्या शंभर पन्नासच्या दोन चारच नोटा किंवा अगदी दहाचं का असेना नवीन बंडल मिळालं तरी अप्रूप वाटतं अशा बाकी शंभर लोकांच्या आनंदाचं मोल जास्त असतं. यातलाच कोणी मग म्हणतो "मेडमजी ये नोट हम दिवाली में पूजामें रखेंगे " किंवा आणखी कोणी मुलगा भाबडेपणी म्हणतो " हे बंडल मी बहिणीच्या लग्नासाठी सांभाळून ठेवेन " आपल्या देण्याचं चीज झालं वाटतं.

सरकार किंवा रिझर्व बँक किती नोटा चलनात आणते आणि त्या नोटांचा हिशेब काय, त्यातले काळेगोरे किती वगैरे तात्त्विक बौद्धिक किंवा आर्थिक चर्चेत मला रस नसतो. जे काही असतं ते एक सर्वसामान्य बँकर आणि एक सर्वसामान्य ग्राहक यांच्यातलं साधंसुधं नितळ नातं असतं.

बँक माझी असली तरी पैसा माझा नाही. आम जनतेसाठी आहे एवढा छोटासा विचार त्या मागे असतो बस. बाकी गोष्टी नेहमी प्रमाणे........ छोट्याच असतात पण भावनिक दृष्ट्या श्रीमंत करणाऱ्या.

---

## *१९. माणसातला माणूस.*

मध्ये एकदा रिलायन्स मॉलला गेले. बिल केलं. कधीकधी काही ऑफर्स पॅकवर स्पष्ट लिहिलेल्या नसतात आणि विक्रेता मुलंमुली पण अशा ऑफर्सबद्दल आपण होऊन सांगत नाहीत. खरेदी केलेल्या वस्तूंवर काही गोष्टी भेट म्हणून दिल्या जातात आणि त्या डिलीव्हरी काऊंटरवर मिळतात. खरंतर ऑफर किंवा फ्री गोष्टीच्या मोहाने वगैरे नव्हे तर नेहमीच्या सवयीप्रमाणे मी बिल डिलिव्हरी काऊंटरवरच्या मुलासमोर ठेवलं. जेमतेम विशीचा तो मुलगा, अजून धड मिसरूडही न फुटलेला. त्याने ते बिल वरून खाली नि खालून वर दोनदा वाचलं. तो मागे वळला आणि वरच्या फळीवरून बिस्किटाचा एक पुडा काढून माझ्या हातात दिला.

म्हंटलं, हे रे कशावर फ्री आहे?

तो छान हसला.

काही बोलला नाही.

म्हंटलं, हो रेss... कशावर आहे?

तो म्हणाला, नाही नाही फ्री नाहीये.

फ्री नाही? मग!

तुमच्या बिलावर काहीच फ्री नव्हतं ना... म्हणून हे असंच दिलं.

वाक्याचा अर्थ कळायला वीस सेकंद गेली असावीत. आणि एकविसाव्या सेकंदाला मी विरघळून पाणी.

काहीच फ्री मिळालं नाही म्हणून, पन्नाशीच्या एका बाईला वाईट वाटेल अशा गोड भाबड्या विचाराने त्याने on his own निर्णय घेत मला तो पुडा देऊ केला.

काय रे काय म्हणायचं या दिलदारीला.

छळवाद नुसता.

सायकॉलॉजीच्या सेशन्समध्ये एक सेशन तुझं पण ठेवायला सांगते रे छोट्या मित्रा. "पुस्तका बाहेरचं बरंच काही" किंवा "डिग्र्यांच्या भेंडोळयां पलीकडे" किंवा माणूसपणाच्या हिरव्या वाटा" वगैरे नाव देत.

जियो. तुम्हे मेरी उमर लग जाए.

बिलाच्या शेवटी एक आकडा असतो Money you have saved. मी त्याही खाली लाखाचा आकडा टाकला आणि लिहीलं genuine human being I have met. माणसातला माणूस मी बघितलेला.

गोष्टी छोट्या असतात पण माणसावरचा विश्वास दृढ करणाऱ्या.

## २०. पार्टनरचं जाणं.

पार्टनरचं जाणं वगैरे मधूनमधून लिहिण्या वाचण्यात येणार विषय. वाढत्या वयाबरोबर आणखी आणखी घाबरवणारा विषय.

तर माझी बँक. बँक खूप मस्त रिफ्रेशिंग क्षण देते पण जोडीनं विचार करायला लावणारे, आतून हलवून टाकणारे क्षणही देते.

मिस्टर अशोक. वय सत्तरच्या पुढे. नेहमी उत्साहात असणारे. येऊन सगळ्यांशी हसून बोलून राहणारे.

मात्र त्या दिवशी आले ते उदास आभाळ घेऊन. गप्पपणे आपली कामं केली. निघतच होते.

मी विचारलं " काय तब्बेत नरम गरम?"

ते म्हणाले "बायको गेली "

"ओह...! "

" नंतर पंधरवड्यातच माझी अँजियोप्लास्टी करावी लागली. महिनाभर कुठे जात येत नव्हतो "

मी चार शब्द बोलले बस. फार काही सांत्वन वगैरे केलं नाही कारण ते कृत्रिम वाटलं असतं.  ते आपलं काम करून ते निघून गेले.

ते बोलणं तेवढ्यावरच राहिलं.

अवघे दोनचार महिने झाले असावेत. ब्रांच बाहेर पडले. मिस्टर अशोक रस्त्याच्या पलीकडच्या बाजूनं चालले होते. मला बघून तिकडूनच त्यांनी अभिवादनाचा हात हलवला. मी सुद्धा हात हलवून त्यांना अभिवादन केलं.

पण.... आज त्यांच्या हातात काठी होती. दोनचार महिन्यात ते दहा वर्ष म्हातारे झालेले वाटले.

अगदी मागच्या महिन्यापर्यंत सहज उत्साहाने बँकेत येऊन गप्पा टप्पा करणारा माणूस, आज काठी टेकत सावकाश चालत होता. खांदे पडलेले होते. जणू जात्या बायकोसोबत त्यांची जगण्याची आस सुद्धा निघून गेली असावी.

का कसं कधी.. काय? बिन उत्तरांचे किंवा ठाऊक असलेल्या उत्तरांचे प्रश्न.

वयाप्रमाणे हे असं व्हायचंच किंवा हजार प्रकारचे ग्राहक त्यांचा हजार तऱ्हा असायच्याच म्हणून सोडून देऊ शकतो आपण हे सगळं.

पण.... गोष्टी छोट्या असल्या तरी छोट्या नसतात, खूप खोल असतानाच खूप ऊंच असतात.

## २१ अन्नदान.

छोट्या छोट्या गोष्टी. देणाऱ्याने देत जावे सांगणाऱ्या. आपल्या कर्तृत्वाबद्दल कुठेही वाच्यता न करणाऱ्या देवदूतांबद्दल बोलणाऱ्या.

नाशिकला कुठे काय चांगलं मिळतं, नवे फूड जॉइंट्स कुठे झाले आहेत वगैरे बोलणं चालू होतं. आणि कोणीतरी म्हणालं नाशकात महात्मा नगरच्या जवळ एके ठिकाणी घरगुती नाश्ता खूप छान आणि स्वस्त मिळतो. मग हॉटेलचं नाव काय, कोणाचं आहे वगैरे प्रश्न आले तर जाऊ सांगत होती, अग्निहोत्री म्हणून एक सिनियर सिटीझन जोडपं आहे. ते हे अन्नदानाचं पवित्र काम करतात. व्यवसाय म्हणून नव्हे तर विरंगुळा म्हणून आणि गरजूंना घरगुती नाश्ता मिळावा अशा स्वच्छ साध्या पण उदात्त हेतूनं. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांकडून ते अमुक एवढे पैसे घेत नाहीत, तर पोटभर खा आणि तुम्हाला वाटतील तेवढे पैसे त्या डब्यात टाका असं सांगतात.

आजच्या मार्केटिंगच्या, जाहिरातबाजीच्या जगात हे काहीतरी निराळं होतं स्वप्नवत होतं. मी केलं मी केलं च्या कल्लोळात हे न पटणारं, न बसणारं होतं. पण जे होतं ते वास्तव होतं. वास्तव आहे.

बस गोष्ट एवढीशीच पण एवढीशी नव्हे.

अशी वेडी माणसं आहेत म्हणून माणूसकी शब्दाच्या व्याख्या वेगळया सांगाव्या लागत नाहीत. त्या थेट अनुभवता येतात. _/!_

## २२. बाबा तुमचं पार्सल.

कसले वेडे असतो आपण. एरव्ही व्यवहारी किंवा प्रॅक्टिकलपणाचे बुरखे पांघरून फिरतो पण कोणत्याशा निसटत्या क्षणी एखाद्या शब्दानंही सेंटी होऊन जातो.

तर झालं असं. सुट्टीच्या वारी रुटीन खरेदीला गेलो होतो. येताना चाऊम्याऊ खायला थांबलो. वडे समोसे वगैरे. आम्ही ऑर्डर दिलेला पदार्थ नेमका संपला होता आणि नवा घाणा गरम तळून येतच होता. दोनपाच मिनटं गेली. तेवढ्यात नवऱ्याचा मित्र तिथे आला. आमच्या गप्पा सुरु झाल्या. आणि पुढच्या पाचच मिनिटात पदार्थ तयार झाला, छान वेष्टनात गुंडाळला गेला आणि आमचं पार्सल आलं.

नवरा अजूनही मित्राशी बोलण्यात मग्न. काऊंटर वरच्या मुलीनं दोन मिनिटं वाट बघितली आणि मग ते पार्सल पुढे करत ती म्हणाली " बाबाss, तुमचं पार्सल "

दोनतीन शब्द ते काय आणि केवढं आभाळ कवेत घेतलं पोरीनं. बाबा तुमचं पार्सल! सहजता आणि निर्मळपणा.

झालं पदार्थ राहिला एकीकडे आणि हा आमचा बाबा तरंगत हळवा बिळवा होत घरी आला. मी हे सगळं बघत होते, त्याच्या चेहेऱ्यावरचे भाव निरखत होते, त्याच्या एवढीच सुखावत होते. वाटेत तो म्हणाला " किती गोड होती ना ती मुलगी?"

मी हसले. हं... ती गोड आणि हा वेडा. आणि एकूण सगळा खुळेपणाचा पसारा.

खरंच किती वेडे असतो आपण, एकूणच भाबडेपणी कोणाला बाबा म्हणून सगळं अंतर मिटवून टाकणारी अशी कोवळी मुलं आणि त्या कोवळिकीत स्वतःला गुरफटवून घेणारे 'बाबा' लोक..!

गोष्टी छोट्या असतात पण हळवं करून जाणाऱ्या.

# २३ आठवणींच्या परड्या.

बारावीची परीक्षा संपली आणि माझे दोन पुतणे माझ्यासोबत नाशिकहून मुंबईला आले. कधी एकदा पेपर टाकतो आणि मुंबई गाठतो अशी त्यांची अवस्था. दहावीची आणि आत्ता कालची सुद्धा. मागच्या वेळी पुरे आठ दिवस राहिले दोघे, यावेळी मात्र CET चं जोखड असल्यामुळे तीन दिवसात परत जाणार होते.

मला नेहमी वाटून जातं, कि हल्लीच्या न्युक्लीअर कुटुंबाच्या फायद्या तोट्याबद्दल हिरीरीने बोलणाऱ्यांनी एवढं तरी करावं, एकेकट्या असणाऱ्या चुलत आते वगैरे भावंडांना तरी जमेल तेव्हा एकत्र येण्याची संधी द्यावी. आमची मुलं आणि ही आलेली मुलं जेव्हा धिंगाणा घालतात तेव्हा आम्हालाच लहान होऊन गेल्यासारखं वाटतं . मुलं सतत फोन अथवा कॉम्प्युटर समोर बसतात हे म्हणणं तद्दन खोटं ठरवत ही मुलं पत्ते 'कुटतात ', कॅरम, दमशेराज, नंतर समुद्र, मार्केट भटकणं, धुवाधार गप्पा, भिंती हलतील असे हसण्याचे धबधबे, शाब्दिक कोट्या आणि अर्थातच आचरट खाणं यात मुलं गुंतलेली पाहिली कि मन प्रसन्न होऊन जातं. या साऱ्या रमखाणात मी आणि नवरा सुद्धा इक्कली आचरट बनतो. म्हणूनच ही मुलं इथे यायला प्रचंड उत्सुक असतात.

एरव्ही अभ्यासाच्या क्रूर रहाटगाडग्यात पिचून निघालेली ही मुलं या सुट्टीच्या दिवसात किंवा त्यांच्याच भाषेत म्हणजे हँग आऊटच्या दिवसात रात्री दोन तीन चारपर्यंत सुद्धा जागत गप्पा मारत बसतात, रात्री दोनला मॅगी किंवा जिलब्या खातात, आणि सकाळी उठून पहावे तर एकमेकांच्या अंगावर कुठेही हात पाय टाकून मनमुराद झोपलेली दिसतात, मग उठणं दहा बारापर्यंतसुद्धा खेचलं जातं, मुलांना असं झोपलेलं बघताना मस्त मस्त वाटत राहतं. हेच तर त्यांचा वाढीचे क्षण असतात. ही सुद्धा त्यांची गरज आहे. त्यांच्या त्या झोपलेल्या चेहेऱ्यांवर सुद्धा समाधानाच्या लहरी उमटून वाहत असतात. मी तर चक्क थांबून बघत राहते त्यांच्या या मस्त खुशमिजाज झोपण्याकडे सुद्धा.

आम्ही एक मात्र करतो एरव्ही त्यांचे व्रतस्थ आई बाबा जे काही सल्ले सूचना न थकता देतात, ते देणं टाळतो, शक्यतो लांब चेहऱ्याने टाकलेले लेक्चर टाईपचे डायलॉग्ज.. अहं... वर्ज्य..... " हवं ते करा " म्हणून आम्हीही सुटतो. मग समुद्रावर जाता, ठसका लागेपर्यंत पाणीपुरी कोंबणं, तोंडं लाल पिवळी करत कपड्यावर डाग पाडत बर्फाचे गोळे खाणे, वाळूत लांब पाय करून आरामात गप्पा हाणत बसणं, आल्यागेल्यावर टीका टिप्पणी करणं, प्रसंगी त्याची नक्कलसुद्धा उतरवणं कधी बांद्रयाच्या किल्ल्यावर जाऊन बसणं तर कधी गेटवेला रपेट आणि काही ही म्हणजे काहीही करणं हे आमचे उद्योग असतात.

मुलं इथे समोर नाहीत म्हणून थोडं गंभीर होत सांगावसं वाटतं कि आपल्याला आजोळ होतं, आजी आजोबा मावशी मामा होते, गाव होतं, झोपाळे झाडं, गुरं आणि खूप काही आठवणीत जपून ठेवण्यासारखं होतं. इव्हेंट मेनेजर्स ना वगैरे पैसे न देता घरच्यांनी घरच्यांना सोबत घेत केलेले चार पाच सहा दिवसांचे सोहळे होते, म्हणूनच आपल्या मनाच्या परड्या त्या सुंदर आठवणींनी भरून वाहू शकताहेत, तर मग हे अपना भी फर्ज बनता है ना कि आपण आपल्या मुलांसाठी भाचवंड, पुतवंडांच्या 'उद्या'साठी आठवणी निर्माण करून ठेवणं!

ही मुलं एकत्र आली कि वेगळंच समाधान वाटून जातं. हे भाऊ माझ्या मुलींची एका भावाच्या नात्याने जेव्हा काळजी घेतात तेव्हा मुलींना सख्खा भाऊ नाही याचा विसर पडतो. (नाही नाही... मुलगा नाही म्हणून मी सेंटीमेंटल वगैरे झाले नाहीये ).

वाटतं, पुढच्या पाच सात दहा वर्षात मुलं शिक्षणासाठी, पुढे व्यवसायानिमित्त कुठे कुठे गेलेली असतील, वर्षावर्षात भेटतील न भेटतील, पण त्याही परिस्थितीत आठवणीचा अनमोल खजिना तर आपण त्यांच्या थैल्यांमध्ये ठासून भरून ठेवू शकतो. आठवणींच्या याच धाग्यातील काही दोर पकडून ही मुलं एकमेकांना धरून राहू शकतील, कुठेही का असेनात! आज आपण जसे आठवणींच्या अथांग डोहांमध्ये डुंबण्याची मजा घेत असतो, तशाच त्यांच्या त्या डुंबण्यासाठी त्यांच्या मजेसाठीचे गोड्या पाण्याचे साठे आपणच भरून ठेवू शकतो.

बरं इथे पैसा प्रतिष्ठा, पोझिशन वगैरेचा दुरान्वयेही संबंध येत नाही. आणि मुलांच्या लेखी तर नाहीच नाही. फक्त एकत्र येणं , हुंदडणं, हसणं गाणं कधी गळयात गळे घालून रडणं आणि खा खा खाणं, या साऱ्यातून एकमेकांच्या जवळ येणं असतं. आणि आपण आजचे आई बाबा, मामा काका मावशी यांनी हे जुळवून आणणं असतं, यात फार मोठं भव्य दिव्य काहीच नसतं पण

तरीही त्याचं मोल फार अधिक असतं , फोटो अल्बम बनतो त्यावेळी त्याचं मोल फक्त पैशाच्या रुपात असतं, परंतु सरत्या काळासोबत पैसा कमी होत होत, त्या अल्बमचं भावनिक मूल्य वाढत जातं. आपण एकच करायचं या आठवणींच्या अल्बममध्ये अधेमध्ये काही रंगीत पिसं, काही पानांच्या नक्षी, सुगंध सांडणारं काही हळूच पेरून ठेवायचं... अगदी कोणालाही न सांगता.

उद्या... अर्थातच काही वर्षांच्या 'उद्या '.... जेव्हा मुलं तो अल्बम उघडतील आणि एक एक पीस हाती धरून बसतील, हळवी होत आठवणींमध्ये हिंदोळत राहतील, तेव्हा रुपेरी बटा सावरत आपण फक्त स्मित हास्य करत असू. मागच्या पिढीने आपल्यावर करून ठेवलेल्या कर्जाची., कदाचित ही किंचितशी परतफेडच म्हणा ना!!!

---

# २४. मी आणि लिरीलची जाहिरात.

लिरीलची जाहिरात. पिळदार शरीराचा हसरा बाबा, तो पाय रेटत चालतोय, आणि चार सेकंदांनंतर दिसतं कि त्याची चिमुरडी त्याच्या पोटरीला बिलगलीये. आणि मग लगेचच दोघं मजेत हिरव्या हिरव्या साबणाने फेस काढकाढून अंघोळ करतात. बघणारा म्हणतो वॉव, व्हॉट अ कन्सेप्ट सर जी!

साल 1993, मी पन्नास किलोमीटरचा चेप गर्दीचा प्रवास करून संध्याकाळी सातला व्हीटी वरून डोंबिवली गाठायचे. ऑफिस आकडेमोड, बॅलन्सिंग, ओव्हरटाईम वगैरे वगैरे. लोकल ट्रेनमध्ये सीट मिळेल न मिळेल कसलीच शाश्वती नाही. घरी आल्याबरोबर हातपाय तोंड धुवून लगेच पदर खोचून स्वयंपाक घरात जायचं. एका हाताने चहा दुसऱ्याने कुकर वगैरे वगैरे. त्यातच फ्रिज उघडून भाज्या बाहेर काढायच्या. तिसरीकडे पोळयांची कणिक मळायला घ्यायची. दिवसभर बाहेर असलेली आई घरी आली कि आपला पूर्ण हक्क तिच्यावर प्रस्थापित करणं आपलं कर्तव्य मानणारी धाकटी लेक मग एक क्षणही मला सोडायची नाही. तिला उचलून खेळवणं, खास तिच्यासोबत बसून तीच कौतुक करणं वेळेच्या दृष्टीनं परवडणारं नव्हतं.  मग ती पायाला घट्ट मिठी मारून ठेवायची. त्यामुळे एका खोलीतून दुसऱ्या खोलीत जायचं झालं , फ्रीजमधून किंवा कपाटातून काही काढायचं असलं तरी तिची माझ्या पायाला बसलेली घट्ट मिठी तशीच राही आणि मी लेकीला पायाला बिलगलेली घेऊन एक पाय रेटत घरभर फिरायचे , आपली कामं करत राहायचे, तिलाही त्यात काही प्रॉब्लेम नसायचा, आईला चिकटून राहणं एवढं एकच तिचं उद्दिष्ट असायचं.

लिरिलची टीव्ही वर येणारी जाहिरात बघून वाटतं तेव्हा ते दिवस शूट करून ठेवले असते तर केलेल्या कष्टाचं सार्थक झालं असतं आणि आज त्या जाहिरातीत दिसणाऱ्या बाप्याच्या ऐवजी मी दिसले असते. अगदी रियल खरीखुरी आई आणि तिला बिलगलेली तिची लेक. कोणालाच वेगळा अभिनय वगैरे करावा लागला नसता कारण आम्ही दोघी ते प्रत्यक्ष जगत होतो आणि हो खोऱ्यानं पैसा मिळाला असता तो वेगळाच

जाऊ दे, एकेकाचे नशीब आणखी काय  :(

---

## २५. मला आवडतं म्हणून.

इटुकली चांदणी चमकावी आणि तिच्या पिटुकल्या उजेडानं सगळं लख्ख व्हावं.

" तू कशाला भांडी घासतेस? मावशी आहेत ना? "

" अगं, भांडी कितीही असली तरी कमीच पडतात, बरं पाणी पिण्याचे पेले, काचेची, कोटींगची, टोकदार वगैरे भांडी आपणच घासतो. डाव चमचे काटे यांच्या कोपरे खाचा स्वच्छ करतोच आणि ऑफिसच्च्या जेवणाचे डबे.... अमुक नि ढमुक " ओटाभर भांडी आवरताना दिलेली रोजची तीच ती स्पष्टीकरणं आणि नव्या स्पष्टीकरणांचा शोध.

"कामाला बाई असताना हे बालदी बालदी कपडे धुवायचं काही अडलंय का? "

" अरे बाबा, तिची म्हणजे आपल्या कामाच्या बाईचीसुद्धा पन्नाशी झाली, हल्ली तिची पण पाठ कंबर दुखते, . आणि दुसरं म्हणजे रंग जाणारे, नाजूक नक्षीचे किंवा ज्यांना ब्रश मारायचा नसतो असे कपडे आपले आपण धुतलेले बरे...... वगैरे वगैरे फलाणं ढिकणं.

बाईला म्हणजे घरकाम मावशीला मदत होते हा घट्ट मुद्दा अर्थातच पहिल्या नंबरावर.

पण अचानक ध्यानी मनी नसताना तीच ती चांदणी चमकली.

का करतेस? का करतेस? काय गरज आहे? आपण एवढे पैसे मोजतो मग आपण काम का करायचं?

केवढे प्रश्न? आणि त्या प्रश्नांची उत्तरं शोधण्याची कित्येक वर्षांची झटापट.

आणि त्या दिवशी अगदी अचानकच उत्तर आपोआप आपण होत समोर आलं. " मला आवडतं म्हणून " हो मला आवडतं हे करायला बस्स.

आह... किती लख्ख झालं सगळं.

" मला आवडतं म्हणून " फक्त तीन शब्द आणि किती गोंधळ घातला आपण? किती स्पष्टीकरणं, शब्दांची जुळवाजुळव . देवा! इथेच तर होतं कि. काय काय? सगळ्या प्रश्नांचं उत्तर. फक्त तीन शब्दांचं! मला आवडतं म्हणून. बस्स.

होतं ना असं बरेचदा. अगदी आपल्या जवळ, कुशीतच म्हणावी अशी कितीतरी उत्तरं असतात आणि आपण खुळयागत चांदण्या शोधत फिरत असतो. अर्थात ती इटुकली चांदणी चमकते आणि तिच्या इवल्याशा प्रकाशानं सगळं उजळून निघतं. गोष्टी छोट्या असतात पण आपल्या तेजानं दिपवून टाकणाऱ्या.

## २६ संस्कारांच्या मूळापाशी.

तर सखीची गोष्ट.

सखी अशीच आमच्या वयाची. पन्नाशी बिन्नाशी आणि नेहमीचे चर्चेचे विषय वगैरे वाली.

हं.... तेच ते आरोग्य, व्यायाम, ताणतणाव नियंत्रण, आयुष्य छानपणे जगणं, जगण्याच्या स्ट्रॅटेजीज वगैरे.

सखी मुंबईतच जन्मलेली मोठी झालेली. आई शिक्षिका, बाबा सेवादलवाले. निरपेक्षता निरिच्छतेचं बाळकडू, साधेपणा आणि जगण्याची सकस तत्वं वारशात मिळालेली सखी.

सखी सांगत होती, त्यांच्या कडे मासे घेऊन येणाऱ्या कोळीण मावशींचीसुद्धा तिसरी पिढी सखीच्या घराच्या तीन पिढ्यांबरोबर समांतर चालत आलेली. पूर्वी मावशीची आई येई आता मावशी येते. सखी घरात नसली तरीही ताजं फडफडीत म्हावरं साफ करून हळद मीठ लावून घट्ट झाकणाच्या डब्यात वगैरे घालून सखीच्या फ्रिजमध्ये ठेवण्याएवढी मावशी 'आपली'..

सखीचा लेक मावशीच्या अंगाखांद्यावर खेळत मोठा झालेला. हक्कानं चार शब्द ऐकण्या बोलण्या एवढा.

तर सखीच्या लेकाचं नुकतंच लग्न झालं. अजून वर्ष व्हायचंय. लेक सून उच्च उच्च विद्याविभूषित वगैरे.

सखीची आई नोकरी करणारी. सखी स्वतः नोकरी करणारी आणि आता सुनबाई पण नोकरी करणारी त्या मुळे नोकरीचे अधिकऊणे पुरेपूर ठाऊक असलेली. त्यात सखीला एकच मुलगा त्यामुळे टिपिकल सासू सून नातं नसून कुठेतरी लेकीची हौस भागवली जाण्याचं सुद्धा मॅटर.

सखी सुनेचं कौतुक सतत सांगत असते. नव्या पिढीचे अतिव्यस्त तंत्र, त्यांची टेन्शन्स, त्यांचे ताण, आव्हानं वगैरे नेहमी बोलले जाणारे विषय. नव्या पिढीचं क्वचित 'अति' वाटावं असं प्रॅक्टिकल असणं वगैरे वगैरे.

तर कोळीण मावशीची आणि नव्या सुनबाईंची अद्याप भेट झाली नव्हती. मावशी चार वेळा म्हणाली सुनबाई बघायचीयं तुझी. तर त्या दिवशी सखी कसल्याशा कामात बुडालेली. आज मासे घ्यायचे नव्हते म्हणून मावशी वर येणार नव्हती. पण ती तळमजल्यावर आलेली समजलं. मग सखीचा लेक आणि सुनबाई खाली गेले. तोवर सखी बाल्कनीत येऊन बघत होती. लेकानं आणि सुनेनं मावशींना वाकून नमस्कार केला. मावशींनी डोक्यावर हात फिरवून तोंडभर आशीर्वाद दिल्याचं सखीला जाणवलं. तिघांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता होती.

प्रत्येक वेळी प्रत्येक गोष्ट शब्दात सांगावी लागत नाही. संस्कार केले संस्कार केले असं असा डंका वाजवावा लागत नाही. काही नाती पिढ्यांबरोबर नितळ वाहत येतात आणि या धारा अशाच पुढे वाहत राहणं त्या धारेत वाहणाऱ्यांवर अवलंबून असतं. तिथे डिग्र्यांची भेंडोळी, खिशातली पाच दहा कार्ड, आपलं पंचवीसाव्या सत्ताविसाव्या मजल्यावर राहणं काही म्हणजे काही आड येत नाही. येऊ नये.

जगणं सुंदर असतं आणि आपण रुजवलेल्या गोष्टी सहज फुलत जाताना बघणं खूप समाधान देणारं.

"त्या दोघांनी मावशींना वाकून नमस्कार केला तेव्हा मला एवढं छान वाटलं, मी शब्दात नाही सांगू शकत " म्हणणाऱ्या सखीच्या डोळयात जे काही भाव उमटले होते, वो देखते बनते थे.

आह, मलाच समृद्ध शांत वाटून गेलं.

पुढची पिढी, नवी पिढी.... बोलत नसली तरी जाणत असते बरंच काही. आणि जुन्या पिढीनं, मधल्या पिढीनं, नव्या पिढीनं हे न बोललेलं, ऐकत वाचत, दुसऱ्याला दाखवत पुढे जाण्यातच ते नितळ वगैरे वाहणं आहे. नाही का!

गोष्ट, म्हंटलं तर छोटीशीच पण संस्कारांच्या थेट मूळापाशी नेऊन ठेवणारी.

## २७ भेटलेली छोटी पण खूप मोठी माणसं.

इस्माईल भाई. रस्त्यावर उभा राहून दोऱ्या, वायर्स, हँगर्स वगैरे विकतो. बाजारात सहज समोरासमोर आलो तर नमस्ते करतो.

मागच्या आठवड्यात त्याच्या खोक्यासमोरून जात होते. तो म्हणाला " दहाचं नवीन बंडल हवं होतं. परवा येऊन गेलो पण कॅशियरनी सांगितलं, नवीन बंडलं संपली. चार दिवसांनी घरी काहीतरी कार्यक्रम आहे वगैरे वगैरे " म्हंटलं उद्या ब्रांच मध्ये आलास कि मला भेट. घरी एक बंडल आहे ते आणून देते तुला.

वीरजीच्या दुकानातून सामान घेतलं. तो म्हणे "उद्या नानो भाई येईल. आईला हॉस्पिटलला ऍडमिट करायचीये. ड्राफ्ट बनवायचाय. त्या आधी सगळ्या अकाउंट्समधून एका अकाउंटमध्ये पैसे ट्रान्सफर करायचेत. अमुक वाजायच्या आत हॉस्पिटलला पोहोचायचंय " म्हंटलं माझं सेक्शन वेगळंच आहे तरीही मी नवरी (रिकामी) असले तर फटाफट करून देईन, नाना (धाकटा) भाईला माझ्याकडे पाठव "

स्टेशनला कंगवे विकणारा, दिवसाला पन्नास शंभर रुपये मिळवणारा आमचा कस्टमर. मी दोन कंगवे घेतल्यावर म्हणे " पैसा एक का ही देना " अर्थातच कस्टमर असलेल्या दुकानदारांकडून कधीच स्पेशल कन्सेशन किंवा भाव पाडून वगैरे न मागितल्यामुळे प्रेम आणि आदर अबाधित राहिलेले.

एखाद्या गरीब ग्राहकाकडे मोजकेच पैसे असताना, अनपेक्षितपणे सांगितले गेलेले वरचे दोन पाच दहा रुपये सुद्धा द्यायला नसताना मग " असतील तर द्या, नाहीतर राहू द्या किंवा नंतर कधी इकडे आलात तर द्या " म्हंटल्यावर आणि त्याचं काम झाल्यावर त्याच्या डोळ्यात उमटणारे भाव.

नोटबंदीमध्ये रात्री नऊ वाजता घराच्या पायरीपाशी आणून सोडणारा आणि पैसे मना करणारा आमचा रिक्षावाला साबीरभाई. किती किती माणसं... माणसं! 🌿🏵️🌿

आह!

प्रत्येक वेळी वाटतं बाबा सोबत असतो. 👧आणि बाबा सोबत त्याची आठ दहा वर्षाची लेक. दुकानाच्या रांगांमधून जाताना, गानू भाई हे तुमच्यासाठी म्हणत चवळीच्या

शेंगांची जुडी गानूंच्या पिशवीत कोंबणारा कोणी, गानू साहेब, चार महिन्यांपूर्वी तुमच्या कडून उसने घेतलेले हे पैसे. द्यायला थोडा उशीरच झाला म्हणणारा कोणी, माझ्यासाठी भरुचची दोन तिकिटं काढून ठेवा म्हणणारा कोणी, शेतात आलेलं पहिलं पीक ज्यात वांगी. हुरडा, तुरीच्या भुईमुगाच्या शेंगा, हिरव्यागार पालेभाज्या असं कायकाय असतं, देवाला नैवैद्य दाखवल्यागत पिशव्या भरून आणून ठेवणारा निष्पाप शेतकरी कोणी. गानूभाईंनी पैशाच्या मोजमापात बसणारं काहीच केलेलं नसतं, ना कशाची जाहिरात वा अपेक्षा. तरी किती किती मणिभाई, शांतीलाल, हसमुखराय, जयंतीभाई, मोटा भाई, प्रभुदास....!!

पैसे प्रतिष्ठा अहंकार इगो पोझिशन, दिले किती घेतले किती या सगळया शब्दांपासून हिशेबांपासून खूप दूर असलेले हे सगळे वेडे प्राणी. 😘🐾

या सगळया भूतकाळात, वर्तमानातले माझे इस्माईलभाई, वीरजीभाई, भाजीवाली उर्मिला, कंगवे विकणारा जुनेद, रिक्षा चालवणारा प्रेमचंद किंवा साबीरभाई अलगद मिसळून जातात. सरमिसळ होत राहते. काळाचे तुकडे इथे तिथे पसरलेले एक होऊन येतात. जगण्याचे अर्थ कळत राहतात, नवे अर्थ सापडत राहतात.

पुनर्जन्म, पुण्याई, नशीब वगैरे आपल्याला काही ठाऊक नसतं मात्र नात्यांच्या ऋणानुबंधाच्या नव्या व्याख्या आपल्याच समोर लिहिल्या जात असतात.

कोणती पुण्याई असते आपली कि आपल्याला अशी 'श्रीमंत ' माणसं भेटतात आणि आपण आणखी आणखी श्रीमंत होत राहतो. कोण बोट धरून चालवत असतं आपल्याला कि स्वच्छ नितळ वाटच समोर येत राहते. काय असतं कसं आणि का असतं ठाऊक नाही! 🙏💐

गोष्टी छोट्याच असतात पण भरून टाकणाऱ्या भारून टाकणाऱ्या. 🌈

## २८. पूरात वाहून गेलेल्या आठवणी.

मुळात चिमूटभर होतं तेही पूराच्या पाण्यानं वाहून नेलं.

टळटळीत उन्हात मला नि दादाला घेऊन मावशी अलिबागला गेली होती. मी वय वर्ष तीन दादा वय वर्ष पाच.

तेव्हाच्या प्रथेप्रमाणे भरपूर पावडर आणि भरपूर काजळ लावून मावशीनी मला आणि भावाला तैयार केलं होतं. दोघांच्या दाट केसांचा एकीकडे सरळ रेषेत भांग पाडून दिला होता.

आईनं शिवलेला सुरेख काळा फ्रॉक ज्याला मोठ्या कॉलरला इवलुशी सफेद लेस. फ्रॉकला खाली पण फ्रिल फ्रिल आणि प्रत्येक फ्रिलला तीच ती चिटुकली लेस. दादा हाफ शर्ट आणि ढगळू हाफ पॅन्ट. एका फोटोत मी हुप्प फुगून पुरी झाले होते. फोटोग्राफरनं दिलेल्या सूचना मला अजिबात मान्य नव्हत्या. कृत्रिम फोटोंबद्दल तिटकारा तेव्हापासूनच असावा का... कोण जाणे!

मावशीनं हौसेनं लावलेलं काजळ बंडखोरपणे डोळयांच्या बाहेर आलं होतं. तेव्हाच्या त्या परडी सारख्या टिपिकल स्टुडिओ टाईप खुर्चीत हि पुरी बसली होती. अक्षरशः माऊचं पिल्लू जणू. आणि फोटो काढणाऱ्याला फूल टशन.

दुसऱ्या फोटोत शेजारी दादा उभा होता. चेहऱ्यावर अपार भाबडे तरी जबाबदारीचे भाव आणि मनाच्या खूप खूप आत जपून ठेवलेलं चित्र म्हणजे दादानं माझ्या खांद्या भोवतून हात वेढून घेत माझ्या फ्रॉकच्या फ्रिलचं एक टोक बारीक चिमटीत पकडलं होतं. मी तशीच फुगलेली पण दादा एकदम अलर्ट.

बाबा गेला, आईनं सगळं भक्कम निभावलं पण 'दादा आहे' हा भावच अख्ख्या जगाचं बळ देऊन जाणारा. फार शब्द बंबाळ नव्हतं आमचं जग. आजही नाही, तरीही न बोललेलं बरंच काही रेखून ठेवलेलं, तो जबाबदारीचा विश्वासाचा धागा आजही तसाच अतूट. तेव्हा त्यानं फ्रॉकच्या फ्रिलचं टोक चिमटीत धरलं होतं आज मी त्याच चित्रातले भाव चिमटीत धरून आहे.

२६ जुलै च्या पूरात छतापर्यंत पोहोचलेल्या पाण्यात सबंध घर तरंगत होतं, पुस्तकं कागदपत्र.... आणिssssss सगळे फोटो.

तेच ते चिमूटभर फोटो.

चिमटीत पकडलेला तो काळ, ते क्षण परत कसे आणावेत. आत त्याचे खोल ठसे घट्ट उमटलेले असले तरी इथे सोडलेले छोटेल्यांचे फोटो बघताना त्या दोन फोटोंची अतोनात आठवण येते.

अहं डोळे अजिबात ओले करायचे नाही म्हणत मी दोन बोटांची चिमूट करते आणि ते दोन फोटो अलगद खाली घेते. तळहातात हलकेच धरत हृदयापाशी नेते. मला ते स्पष्ट दिसत असतात.... नजर धुरकटलेली असली तरीही.

गोष्टी छोट्या असल्या तरी आठवणी खोल ओल्या.

## २९ मोठे झालेले भाचे पुतणे वगैरे.

प्रसंग 1.

"काकू काय करतीयेस?"

"काही नाही रे अशीच बसल्ये. "

"चल तुला नव्या गाडीतून चक्कर मारून आणतो " म्हणत पुतण्या मस्तपणे पोलोचं दार उघडतो.

"हं बस ". काकू बसते.

तोच दार लावतो सुद्धा. गाडीत कुठलंतरी ढांगचीक गाणं सूरू होतं पण आज काकू अजिबात ईरीटेट होत नाही.

जरा जास्त स्पीडमध्ये चालते गाडी पण वयाचा खुमार म्हणत काकू म्हंजेच मी राईड एन्जॉय करते.

प्रसंग 2.

वहिनीचा निरोप घेत मी म्हणते " चल गं निघते "

भाऊ वहिनी विचारतात "कशी जाणारेस "

"बस स्टॉप पर्यंत तर जायचंय, जाते रिक्षाने "

भाचा त्याचे व्हॉट्सऍप बाजूला ठेवत म्हणतो " आत्या थांब गं..... सोडतो तुला "

अरे मी जाते

"थांsssब गं " म्हणत नेसत्या थ्रीफोर्थनिशी तो किटोत पाय अडकवतो, चावी घेतो, टू व्हीलरला किक मारतो " आत्या दोन्हीकडे बस बर का "

वाहन सुटते, इथे पण जोशात. मी म्हणते "अरे जरा हळू "

"तू बस बिनधास्त, मला सवय आहे "

मग हेल्मेटच्या फटीतून गप्पा, पुण्याला पुढच्या कोर्स साठी जायचा तपशील, जो वहिनीनं ऑलरेडी मला सांगितलेला असतो.

" जपून रे बाबा " आत्याचा काळजीभरला स्वर पण सोबत कौतुकाची दाट झालर सुद्धा.

पुतण्या काय भाचा काय, वय वर्ष एकोणीस ते एकवीस, गप्पांमधून माझ्यासमोर नव्या पिढीचे विश्व उलगडत असते, अगदी आईबाबा आणि मुलांमधल्या कम्युनिकेशन गॅपपासून गर्लफ्रेंडपर्यंत, किती ताज्या भावनिक गोष्टी शेअर होत असतात, किती सुंदर स्टेटस ही मुलं मला देत असतात त्यांना सुद्धा कल्पना नसते.

पुन्हा पुन्हा जाणवतं कोणी तरी ऐकून घेणं हि प्रत्येक जीवाची केवढी मोठी गरज असते आणि ती कितीकदा अतृप्त राहून जाते.

काल ज्यांना उदारपणे मी खिडकी ऑफर केली होती ती ही मुलं मोठी झाली तरी कधी, ड्रायव्हिंग शिकली कधी?

आणि आज मस्तपणे मलाच लिफ्ट देतायत.

मला फार सॉलिड वाटत राहतं. तुम्ही भारीच आहात रे पोरांनो, म्हणूनच मला खूप जास्त आवडता.

बिनधास्त बोलनेका अपनी आत्याके साथ, काकूके साथ …जियो. सगळी मरगळ कुठच्या कुठे पळून जाते या पिढीसोबत बोललो कि.

भारी भारी. असेच उमलत रहा… उलगडत रहा स्वतःला आणि छोट्या छोट्यागोष्टींमधून आम्हालाही ऊर्जा देत रहा.

## ३०. सलाम तिच्या जिद्दीला.

"अशा मध्यरात्री ते हि टू व्हीलरनी? जायलाच हवं का रे?"

"अगं आई, मी जाईन व्यवस्थित. चिल. "

चलबिचल एका आईच्या मनाची. लेकाच्या मित्राला झालेला रोड ऍक्सीडेन्ट आणि त्यातच संपलेला तो जीव. अजून आठवण ताजी, वेदना ओली.

तरीही लेक निघालेला. हातात टू व्हीलरची चावी, घड्याळाने रात्री अकराचा काटा ओलांडलेला.

" पोचलास कि फोन कर रे बाबा ".

" तू झोप. मी कळवतो "

लेक गेला. बाईकला किक मारल्याचा फर्रर्रर्र फर्रर्रर्र आवाज आला. झोप काही येई ना. डोक्यात काहूर माजलेलं. वास्तविक त्याला पोहोचायला तीनेक तास तरी लागणार ठाऊक असून तासाभरापासूनच तिचे फोनच्या रिंगकडे कान.

उशिरा कधीतरी तिचा डोळा लागला.

रात्रीत नेमकं काय झालं कोणालाच कळलं नाही. सकाळी हि उठली ते एक हात एक पाय हलवता येई ना. आपण अजून झोपेत आहोत का? अहं. देवाss.... हे काय होतंय मग? मी हात का उचलू शकत नाहीये... आणि मला बिछान्यातून उठायचं आहे.. पण हा देह का साथ देत नाहीये?

मला बोलायचंय. हं शब्द उमटतायत अजून.

तिने नवऱ्याला हाक मारली. तिची अवस्था बघून तो हबकला. शेजारी आले. धावाधाव केली. थेट हॉस्पिटल.

बाहेर काळजीने खदखदणारे चेहरे. आतला जीवघेणा विलंब.

काय... काय सांगतील डॉक्टर?

आणि सिस्टर सांगत आली " तुम्हाला आत बोलावलंय "

नवरा आत गेला. मध्यरात्री कधीतरी याना पॅरालिसिसचा तीव्र अटॅक येऊन गेलाय. कसला तरी प्रचंड ताण मेंदूवर आलेला असावा. जर तेव्हाच कळलं असतं आणि दोनेक तासात इथे आणलं असतं तर परिस्थिती आटोक्यात राहिली असती. पण..!

सगळं संपलं कि काय. उफ्फ!

लेकाला जाऊ नको सांगत होते तरीही तो अशा अडनिड्या वेळी गेला. त्याच्या मित्राचा चेहरा, विच्छिन्न देह, आईचा आक्रंद आणि सोबत नको नको त्या धास्तावलेल्या शक्यता. मेंदूला हे सगळं असह्य होऊन शेवटी कुठेतरी ते पास ऑन झालं. आणि हात पाय चेहऱ्याची एक बाजू पंगू.

अशी किती वर्ष गेली. आठ दहा कि जास्तच.

पोटच्या पोराची गोष्ट आणि तिचा धीर कुठे गेला न जाणे, एरव्ही ती मोठ्या धीराची बाई. टेबल टेनिस टुर्नामेंट्सना ऑफिसला रिप्रेझेन्ट करणारी. सतत उत्साही, आनंदी, सळसळणारी, नवनवीन गोष्टी ट्राय करणारी, छान प्रसन्न हसणारी.

पण गोष्ट संपली नाही. पुढची गोष्ट तिने स्वतः घडवली. बिघडलेली कहाणी नेटानं वाटेवर आणली.

ती परवा भेटली.

अटॅकचा खाणाखुणा इतक्यात पुसल्या जाण्यासारख्या नव्हत्या. एक हात लुळा आहेच. चालण्यात सुद्धा एक पाय तितकीशी साथ देत नाही. पण जुना उत्साह आनंद परत मिळवण्यात ती यशस्वी झाली आहे. जोरात बोलत होती, मोकळं हसत होती. आपल्या घोगऱ्या आवाजात सगळयांची विचारपूस करत होती.

ट्रेन प्रवास शक्य नाही.

कशी आलीस? या प्रश्नावर ती सहज म्हणाली. कारने आले.

ड्रायव्हर?

मोकळेपणी हसत ती म्हणाली " अहं, मीच ड्राइव्ह करत आले "

कुठून बोरिवलीहून?

हं.

तू बोरिवलीहून कुलाब्याला ड्राइव्ह करत आलीस?

येस, एक हात एक पाय काम करत नाही, पण मी चालवू शकते गाडी. हां जाताना मात्र ट्राफिक असेल, त्यामुळे दादरला आईकडे रात्री राहीन आणि सकाळी बॅक होम. बोरिवली. (आणि एक मोठं खास तिचं वालं गडगडाटी हसू )

माझे शब्द संपले होते.... जे काही उरले होते ते अपुरे होते कारण मी फक्त थक्क होऊ शकत होते. दिवाळीला रडक्या पोस्ट्स टाकू नये ठाऊक आहे, म्हणूनच हि खूप गोष्टी सांगणारी खरी कहाणी.

या सगळ्या प्रसंगानंतर तिच्या लेकाची काय प्रतिक्रिया असेल? म्हणजेच या प्रसंगातून, लेकाच्या वयाच्या मुलांच्या मनात कोणते विचार, कोणते बदल उमटले असतील? या अशा गोष्टींचा प्रमाणाबाहेर ताण घ्यायचा नाही, म्हणणं सोपं पण अंगिकारणं अवघड नव्हे तर अशक्य. मुलांना चिल आऊट वाटणाऱ्या गोष्टी पालकांसाठी किती सूक्ष्म पदर घेऊन वावरत असतात, हे मुलांपर्यंत कसं पोहोचावं?

या सगळ्या प्रश्नांवर, शंकांवर उपाय काय? प्रश्न आणि त्याची आपापल्या परीनं मांडलेली उत्तरं. मिळालेली आणि मिळवायची. आई आईच असते. काळजी करू नको असं कोणी कितीही म्हंटलं तरीही ते अजिबात न ऐकणारी बाई असते.

अहं सरसकट उदात्तीकरण वगैरे नाही पण तरीही!

मरणाच्या वेशीवरून स्वतःला जिद्दीनं खेचून परत आणणाऱ्या तिला शेवटाला कडक सलाम.

होय दिवाळीचा दिवा म्हणून.

## ३१ गावच्या आठवणी खोल उरात

मी ऑफिसमध्ये माझ्या सहकारी मित्राला सुहासला सांगत होते " ते पलीकडे बसलेले मणिकाका ना आपल्या बडोद्याचे आहेत. त्यांच्या बोलण्यात नेहमी बडोदा ( सॉरी, वडोदरा ), चोरंदा, मोटीकोरल, चाणोद, मकरपुरा वगैरे संदर्भ येतात. तीनचार महिन्यात एखाददा ते गावाला जाऊन येतात. चोरंदाला त्यांची शेती आहे. "

सुहास पण बडोद्याचा. तो छान हसला.

मणिकाका बँकेत आले कि बँकेचं काम झाल्यावर माझा प्रश्न असतोच "आटलामा गया ता के नई चोरंदा? क्यारे जवाना? "

मग ते सांगतात, मागच्या महिन्यात जाऊन आलो आता पुन्हा डिसेंबरला जाईन. आत्ता तिकडे हवा अशी आहे आणि अमुक तसं नि तमुक असं असं आहे. त्यांच्या शब्दांसोबत मी त्या त्या ठिकाणी फिरत राहते अगदी काकांच्या न बघितलेल्या शेतात सुद्धा जाऊन येते.

काका डिसेंबरला बडोद्याला जाणार... आह किती भाग्यवान! मी म्हणते " हां त्यारे तो उंधियु ने पोंक ( हुरडा ) पण मजाना मळशे " म्हणेस्तोवर मी बडोद्याला किंवा माझ्या गावाला मियागाम करजणला पोहोचलेली असते.

काकांना पेमेंट देताना मग काहीतरी सौम्य आपलेपण दाटून येतं. त्यांनी न मागताच निवडक नोटा आपोआप दिल्या जातात. इतरांना वाईट किंवा टाकाऊ द्यायचं म्हणून नव्हे पण जणू आपल्या गावच्या म्हणजेच आपल्या माणसाला आपल्या आवाक्यातलं तरी काहीतरी खास द्यावं तसं.

मणिकाका जाताना मला उगाचच वाईट वाटतं, जे त्यांचा गावी सुद्धा नसतं. पंचाहत्तर ऐंशीच्या आसपासचे मणिकाका बघून मला वाटतं कि माझे बाबा आणि मणिकाका कधी भेटले असतील का एकमेकांना, तिकडे गावाला रेल्वेचं तिकीट वगैरे काढताना? खुळेपणा आणखी काय!

तर सुहासचं आणि माझं मणिकाकांबद्दलचं बोलणं चालू असताना मिस्टर कादरी, एका इंडस्ट्रीचे मालक समोर उभे होते. आमचं बोलणं ऐकून हसत होते. मग संभाषणात शामिल होत ते म्हणाले, तमने एक प्रसंग कहू स्मिताबेन. मी स्वित्झर्लंडला गेलो होतो. परतीच्या फ्लाईटला वेळ होता म्हणून जवळच्या एका शॉपिंग कॉम्प्लेक्स मध्ये फिरत होतो. आणि माझ्या

लक्षात आलं, कोणीतरी माझा पाठलाग करतंय. आधी वाटलं भास असेल पण नंतर खात्री झाली. मी शेजारच्या सेक्शनमध्ये गेलो, आणखी पुढे, मागच्या भागात पण ती ओव्हरकोट घातलेली व्यक्ती ठराविक अंतर ठेवून आसपास वावरत होती. परका देश. मी परदेशात बराच फिरलो असलो तरी त्या वेळी काहीतरी विचित्र भीती दाटून आली. सर्दीमेभी पसीने वगैरे. पुढे तर मी चक्क धावल्यासारखा स्टोर्सच्या बाहेर आलो तर ती व्यक्ती पण माझ्यापाठी.

क्षणभर थांबलो, विचार केला. हे असं कुठवर पळत राहू मी. आणि जाऊ तरी कुठे. मग नीटच थांबलो. त्या व्यक्तीकडे बघितलं. ऊंच धिप्पाड गोरा तो गृहस्थ माझ्याजवळ आला. माझ्या काळजाचे ठोके वाढलेले मला जाणवत होते. तरी वरकरणी मी नजर थंड ठेवत त्याच्या कडे बघितलं.

तो माणूस म्हणाला " Are you an Indian? "

मी म्हंटलं " yes "

तो म्हणाला " मी तुझ्याशी हिंदीत बोलू शकतो का?"

म्हंटलं " बाय ऑल मीन्स "

आहsss माझ्या मनावरचं दडपण अलगद खाली आलं.

तो दिल्लीचा होता. सिनेमात दाखवतात त्या प्रमाणे उनके पुरखे दोन पिढ्यांपूर्वी इथे येऊन सेटल झाले. थोडंफार हिंदी पंजाबी घरात बोललं ऐकलं जातं.

जुजबी गप्पा झाल्यावर तो म्हणाला " और एक फेव्हर चाहिये "

म्हंटलं " कहिये "

तो व्याकुळल्या स्वरात म्हणाला " Can I hug you? " मी होकार देता त्याने जी काही उबदार मिठी घातली कि बस. ( हे ऐकताना मला मणिकाकांसोबत शेतात फिरणारी, शेतातल्या कोवळ्या रोपट्यांना अलगद स्पर्श करणारी मी दिसू लागले. )

सांगताना मिस्टर कादरी त्या क्षणात शिरले किंवा त्या माणसाच्या हगमध्ये जणू बुडून गेले.

बस बाकी पुढे काही सांगावं बोलावं लागलंच नाही.

गोष्टी छोट्याच असतात पण चिंब भिजवून टाकणाऱ्या.

## ३२. एक सॅकची गोष्ट.

काही लोकांना प्रत्येक गोष्ट वाजवून घ्यायची, हक्क म्हणून मागून वसूल करून घ्यायची सवय असते तर काही लोक असेल त्याच्यात आनंदी असतात. मुळात असलेल्यापेक्षा आपल्याला काही अधिक हवंय हेही जणू त्यांच्या गावी नसतं. शांतता समाधान जणू त्यांच्या रक्तातूनच वाहत असतात.

तिची लेक, आता गेली लग्न होऊन सासरी. पण तेव्हा कॉलेजला असतानाची गोष्ट.

अकरावी बारावी, क्लास कॉलेज प्रॅक्टिकल्सचा धबडगा. सकाळपासून निघायची, संध्याकाळ सरता परतायची.

तर त्या दिवशी त्यांचं ठरलं होतं कुठेतरी जायचं. म्हणून लेकीच्या क्लासजवळच्या बस स्टॉप वर ती आणि नवरा लेकीला भेटून तिघे पुढे जाणार होते.

लेक यायला वेळ होता, लेकीची आई असंच आसपासच्या कॉलेजवाल्या मुलामुलींचं निरीक्षण करत होती, प्रत्येकाच्या हातात टकाटक फोन होते, कपडे स्टायलिश होते आणि एकेकाच्या सॅक किंवा बॅग्स सुद्धा करकरीत मस्त फ्रेश रंगाच्या, त्यांच्या वयाला साजेशा टवटवीत.

उधळपट्टीचा आपला स्वभाव नसला तरी आवश्यक गोष्टी घेताना आपला हात कधीच आखडलेला नसतो.... मग हे असं!

तिच्या मनातलं वादळ सुरु झालं, अचानक ती उदास अबोल होऊन गेली. नवऱ्याला काही कळेना.

पाचसात मिनिटांनी लेक आली, तिच्या खांद्याला खांदा घसटत गोड अभिवादन केलं.

कधी आलात, खूप वेळ झाला का?

तिच्या डोळ्यात अश्रू तरळून आले.

आई, काय झालं?

अहं काही नाही.

बाबाsss....?

नाही बॉ, मला काहीच कल्पना नाही, घरून निघताना चांगली खुशीत होती.

आई, बोल ना, काय झालं, आजोबांकडे नको जाऊया का?

अहं, जाऊया. चल बस आली बघ.

बसमध्ये या दोघी शेजारी बसल्या, बाबा मागे कुठेतरी.

लेक तिचा हात हातात घेत म्हणाली " हं, सांग आता "

किती उकडतंय ना!

आई ssss..... बोल काय झालं?

मघा आवरलेले अश्रू पुन्हा ओघळले. लेकीच्या सॅकला हात लावत ती म्हणाली " अगं तुझी सॅक बघ. "

का..... काय झालं सॅकला?

अगं मी आता स्टॉपच्या आसपास वावरणाऱ्या मुलामुलींच्या सॅक्स बघितल्या आणि.....!

इट्स ओके आई, यात काय मोठंसं?

तुला कधी वाटलं नाही का गं. नवीन सॅक घ्यावी, किती विटलीये बघ ही. तीन वर्ष सतत वापरतीयेस एकच एक सॅक.

म्हंटलं ना इट्स ओके आई.

तिचं मन प्रचंड दुःखाने आणि त्याहून जास्त अपराधीपणाने भरून आलं. शी काय आई आहे मी. जर आज ही मुलं दिसली नसती, त्यांच्या सॅक्स कडे माझं लक्ष गेलं नसतं तर हे वेडं पोर न जाणे किती दिवस हि असलीच सॅक वापरत राहिलं असतं. किती दिवस.... हं!

अस्वस्थ अस्वस्थ.

आपण आजच नवी सॅक घ्यायला जातोय. आणि पुन्हा असं......!!

आई, प्लिssssज.... सोड ना..!!

"वेडं पोर ते " म्हणेस्तोवर तिचे शब्द जड होऊन गेले

लेक तिचा हात थोपटत राहिली, आता खिडकीतून छान थंड हवा आत येत होती.

# ३३. चटपटीत मुलं.

मुलं चटपटीत असल्याचा पालकांना अभिमान असतो, पण कधीकधी वाटतं मुलांनी एवढं सुद्धा चटपटीत असू नये.

एक आजी बँकेत आल्या, सोबत त्यांच्या ३ आणि ५ वर्षाच्या दोन नाती होत्या.

आजींना म्हंटलं काय सुट्ट्या लागल्या वाटतं?

तर आजी म्हणाल्या, तर काय? यांच्या सुट्ट्या आणि आम्हाला डबल ड्युटी. दोन मुलांच्या या दोन मुली माझ्याकडेच असतात दिवसभर. दिवसभराची यांचं खाणं पिणं नि भांडणं सोडवणं हाच उद्योग असतो.

आजीचं काम होईस्तोवर मी या दोन चांदण्या ओजस्वी आणि अद्वैता बरोबर नेहमीप्रमाणे गप्पा मारत होते. धाकटी ओजस्वी सफरचंदासारखे गाल फुलवून फक्त खुदुखुदु हसत होती, फार बोलत नव्हती. तिच्या हातावर मी पेनाने एक ठिपका काढला तर खुदकन हसली म्हणाली अद्वैतालासुद्धा काढून दे. ( द्या नव्हे ...'दे' बरं का :) )

मग अद्वैताची फरमाईश आली, माझ्या हातावर A आणि तिच्या हातावर O काढ.

गप्पांच्या ओघात अद्वैताने ते समुद्रावर गेले तिथे आजीने घरचेच वेफर्स दिले हे सांगितलं, घरी जेवण कोण बनवतं, आम्ही दुपारी काय काय करतो, दोघींचे बड्डे कधी, मी आता जूनमध्ये फर्स्टमध्ये आणि ओजस्वी नर्सरीला जाणार वगैरे सगळं सांगितलं.

बोलता बोलता तिने स्वतःची आणि ओजस्वीची आई जाते कधी येते कधी ते सांगितलं. दोघींचे बाबा सुद्धा येतात कधी आणि जातात कधी ते अगदी परफेक्ट टायमिंग देत सांगितलं. दुपारी आम्ही दोघी आणि आजी एवढेच घरी असतो हेही सांगितलं.

मी अरे वा वा वगैरे म्हंटलं. पण मनात विचार चक्र सुरु झालं. बँकेत येणारा ग्राहक काम करून निघून जातो पण मेंदूला निरनिराळ्या प्रकारचं काम देऊन जातो. तर या तडतड लाह्यांचा बोलणं ऐकून मनात विचार येऊन गेला, मुलं पर्सनल गोष्टी किती सहज सांगून जातात. या अशा गोष्टी अनोळखी माणसाला सांगू नये हे या मुलांना नेमकं कसं सांगावं. सहज सहज म्हणून

किती सहज हे सगळं बाहेरच्या व्यक्तीला कळू शकतं. बरं कोणाला काय सांगायचं आणि कोणाला लांब ठेवायचं या मोजपट्ट्या या छोट्या जीवांना कशा दाखवायच्या.

म्हणून वाटतं आपल्या मुलाला फार चटपटीत वगैरे नाही म्हंटलं तरी हरकत नाही पण काही गोष्टी घराबाहेर न गेल्याच बऱ्या.

काही पाळीव प्राण्यांना हि उपजत समज असते, काही घरातले कुत्रे, अनोळखी व्यक्ती दिसता भुंकायला सुरुवात करतात पण आलेल्या व्यक्तीशी जर घरातलं माणूस बोलत असेल तर ते शांत होतात, आणि तिथेच आसपास राहत त्यांचं संभाषण ऐकत बसतात.

तेव्हा घरी आलेल्या आणि आईबाबांच्या ओळखीच्या व्यक्तींसोबतच तेही विचारलेल्या गोष्टीच बोलाव्या हे ज्ञान माणसाच्या मुलाला कसं देता येईल?

गोष्टी छोट्या असतात पण विचार प्रवृत्त करणाऱ्या.

---

# ३४. माधुकरी.

गोष्ट जुनीच पण आशय अनंतापर्यंत ताजा रहावा असा.

आई मामा मावश्या त्यांच्या आईला म्हणजे माझ्या आजीला मामी म्हणत, तसंच बाबा आणि काका आत्या त्यांच्या आईला काकू म्हणत. लहानपणी हे काहीतरी वेगळं वाटायचं पण नेमकं काय ते सांगता यायचं नाही.

किंचित कळायला लागल्यावर एक दिवशी आईला विचारलं, हे असं कसं? आपल्याच आईला तू आणि बाबा मामी किंवा काकू का बरं म्हणता?

त्या वर तिने दिलेलं उत्तर ऐकून मी भारावून गेले. आई सांगत होती त्या काळी म्हणजे तिच्या लहानपणी, आजपासून सत्तरेक वर्षांपूर्वी त्यांच्या कडे शिकायला चुलत मावस वगैरे भावंडं असायची, हि समवयस्क मुलं आजीला म्हणजे आईबाबांच्या आईला किंवा वडिलांना जी हाक मारत तीच हाक त्या आईवडिलांची सख्खी मुलं सुद्धा मारायची. आणि हा अगदी जनरल ट्रेंड असे.

दोन्ही घरी श्रीमंती फार उतू जात होती अशातला भाग नव्हता, हां गरजा नीट भागत होत्या एवढंच. बाकी मध्यम मध्यम वर्गीय टिपिकल ब्राह्मणी घरं ती. शेतीवर कुटुंबाचं व्यवस्थित भागत असे एवढंच. आणि मुलं प्रत्येक जोडप्याला चार पाच पासून अकरा बारा पर्यंत सुद्धा. पण अशाही परिस्थितीत माझ्याकडे एक रुपया आहे तर त्यातले चार पैसे किंवा निदान दोन पैसे तरी मी त्याला देईन किंवा अप्रत्यक्ष मदत करेन, ज्याच्याकडे तेवढे चार पैसे सुद्धा नाही. मुलांचं उदरभरण व्यवस्थित झालं पाहिजे मुलं शिकली पाहिजेत असा स्वच्छ शुद्ध हेतू असे आणि मुलात मूल वाढून जातं म्हणत मग आपल्यापेक्षा गरीब अशा नातेवाईकांची मुलं किंचित मोठ्या गावच्या घरांमध्ये सहज राहून शिकून मोठी होऊन जात.

दोन्ही घरी माधुकरी येई. आजच्या पिढीसाठी हा शब्द सुद्धा तद्दन अनोळखी. माधुकरी ला ताजं गरम अन्न वाढलं जाई आणि अन्न शिजायला वेळ असेल तर धान्याचा शिधा दिला जाई. देवाच्या नैवेद्याचं पान वाढलं जाई तसं माधुकरी व्यक्तीचं सुद्धा पान आस्थेनं वाढलं जाई.

माधुकरी काय किंवा शिक्षणासाठी मुलं आपल्या मुलांसोबत ठेवून घेणं काय, समाजाचा गाडा सुरळीत चालवा यासाठीया पद्धती  किती साह्यरूप होत्या.

कोणताही गवगवा नाही, मिजास मिरवणं नाही. डोनेशनच्या पावत्या नाही आणि सेक्शन 80 खाली दाखवणे नाही.

कोणी लिहून ठेवलेले नव्हे परंतु परंपरेने चालत आलेले, सहज आपलेसे केले गेलेले नियम.

आज त्यांचं महत्व नव्याने कळतंय. त्या परंपरा बनवणाऱ्या, जपणाऱ्या आणि रुजवणाऱ्या जीवांना केवळ साष्टांग दंडवत  _/_

## ३५ कसारा लोकल आणि केशरी गंमत.

३.४७ ला सुटलेली कसारा लोकल.

ऊन मी म्हणत होतं, अंगाची काहिली म्हणजे काय ते पुरेपूर कळत होतं.

समोर एक अशिक्षित वाटेल असं जोडपं. आदिवासी नव्हे पण तशाच काहीशा भाषेत एकमेकांशी बोलत होतं. अगदी सुमार कपडे. पण नवरा बायकोच्या चहेऱ्यावर विलक्षण शांतता. बाई गरोदर दिसत होती पण कुठेही चिडचिड खिचखिच नाही.

त्यांच्या सोबत त्यांचा पाचेक वर्षाचा मुलगा होता.

मधेच फोनवर बोलत त्यातला बाबा दारापाशी गेला, ( होय हल्ली कामगारांकडे सुद्धा मोबाईल असतातच कि ) तर त्या बाबाच्या जागेवर एक बाई येऊन बसली, बाबा संभाषण संपवून परत आला, त्या बाईला तिथे बसलेली बघून तो दुसरीकडे जागा होती तिथे थोडा दूर जाऊन बसला.

गाडीत लीमलेटच्या गोळया विकायला आल्या. पाच रुपयाला चार चंद्राकार केशरी गोळया. त्या कुटुंबानं त्या विक्रेत्याकडे बघितलं. आईने मुलाला गोळयाचं पाकीट घेऊन दिलं. झीप लॉक उघडायला मदत केली. छोट्याने पिशवी उघडली. आणि काय करावं....... तर एक गोळी काढून आधी आईला दिली, बाबा दूर बसला होता, त्याला बोलावून बोलावून दुसरी गोळी त्याला दिली, तिसरी स्वतःच्या तोंडात टाकून मिट्ट आवाज करत गोळी चाटली. तिघे जण त्या केशरी आनंदात डूब बुडून गेले.

ते दृश्य बघून मी आणि माझा नवराच फ्रेश होऊन गेलो.

उन्हाची काहिली कुठच्या कुठे पळून गेली.

खरंच काही गोष्टी शिकवून येत नाहीत, त्या रक्तातूनच पुढे वाहत राहतात.

जगणारे जगत असतात आपापल्या परीने, सुखातही कुंथणारे आणि शून्यातही स्वर्ग ऊभा करणारे.

गोष्टी किती छोटय़ा असतात पण खूप काही शिकवून जाणाऱ्या!

# ३६ तीन पैशाचा तमाशा.

त्या नंतर काळजात धडधड आणि नजर चोरुनच जाणे होई.

तर झालं असं, माझा नवरा माझा नवरा झालेला नव्हता तर अठरावीस वर्षाचा मुलगा होता तेव्हा भुसावळला टिंगलटवाळ्या करत फिरायचा.

वडील रेल्वेमध्ये गार्ड होते. नवरा आणि त्याचे मित्र शाळाकॉलेज बंक करत रेल्वेलाईन वरून जाणाऱ्या पुलावर उभे राहून खालून जाणाऱ्या गाड्यांना आणि गाडीतल्या पॅसेंजर्सना हात देत टारगटपणा करत बसायचे, एकदा नवऱ्याने गाडीच्या गार्डला सवयी प्रमाणे बायबाय केलं, दुसऱ्याच क्षणी मित्राने सणक्यात एक चपराक दिली आणि म्हणाला "XXXच्या तुझे बाबा होते ते"

तेव्हा गावात म्हणजे गावच्या वेशीपाशी तमाशाचे फड लागत. तर नवरा एकदा गावचा तमाशा बघायला गेला. खेळ सुरु झाला. पागोटी फेटे उडवले जाऊ लागले आणि शिट्ट्यांनी कनात दुमदुमून गेली. आणि सहज वळून बघितले तर काय! दोन रांगा सोडून शाळेतले मास्तर पण तमाशाला बसलेले, स्टेजच्या तेजाकडे बघणाऱ्या मास्तरांचा चहेरा सूर्यफुलाप्रमाणे खुललेला होता . एका गाफील क्षणी नवरा आणि मास्तर या दोघांची नजरानजर झाली. मात्र या क्षणानंतर नाचणारी बाई बिचारी तिकडे नाचून दमली आणि इकडे घाम फुटलेला यांना.

आता काय! पुढे काय! तोंड दाखवायची चोरी झालेली. नजरेला नजर भिडवणं अशक्य होऊन बसलं.

एरव्ही संपूच नये वाटणारा तो तमाशा कधी संपेल असं झालं , पब्लिक बाहेर आलं. मास्तर कनाती बाहेर थांबलेले. बाहेर जायला दुसरी चोरवाट सुद्धा नाही, थोडा वेळ काढायचा प्रयत्न फसल्यानंतर नाईलाजाने नवरा त्याच एक्झिट मधून बाहेर आला.

मास्तरांनी त्याला नजरेनेच जवळ बोलावलं. झालं, याच्या डोळ्यासमोर काजवे चमकले आणि तेव्हाच्या परंपरेप्रमाणे आता कानफडात किंवा ढुंगणावर सणसणीत बसणार याची मन घट्ट करत मानसिक आणि अंग घट्ट करत शारीरिक तयारी केली.

वर्गात धडकी भरवणारा मास्तरांचा आवाज काही चमत्कारिकच आला ते म्हणाले " जोगळया, मला वचन दे "

मास्तर काय वचन मागतायत? असून असून काय असेल...! असेल बुवा "पुन्हा तमाशाला येणार नाही" किंवा मन लावून अभ्यास करेन आणि एवढे एवढे मार्क मिळवून दाखवेन वगैरे वगैरे काहीतरी मास्तरांना अपेक्षित असेल आणि तेवढ्यावर भागत असेल तर आपल्या वडिलांचं काय जातंय, म्हणत नवरा वचन म्हणून द्यायच्या शब्दांची जुळवाजुळव करतच होता, तेवढ्यात मास्तर आणखी चोरटा आवाज लावला. आपलं तोंड ऐकणाऱ्या कानांच्या अगदी जवळ आणलं. त्यांचे शब्द गुहेतून आल्यागत घुमून आले. त्याच त्या गोलाईयुक्त गंभीर आवाजात मास्तर नवऱ्याच्या कानात म्हणाले " वचन दे, .... वचन दे जोगळया.. काकूंना काही सांगणार नाहीस"

(तेव्हा मास्तरांची बायको समस्त गावाची काकू असायची )

" वचन दे, काकूंना काही सांगणार नाहीस " हे वाक्य अनलाईझ व्हायला एखाद मिनिट गेलं, आणि नवऱ्याच्या मेंदूत आनंदाचा बॉम्ब फुटला. ओहो ओहो, तर हे असं वचन काय बच्चमजी!

त्या दिवसापासून भूमिकांची अदलाबदल होऊन गेली . त्या नंतर काळजात धडधड आणि नजर चोरुनच जाणे होई पण........... नवऱ्याचे नव्हे तर मास्तरांचे. गोष्टी छोट्या असतात पण तिकडचा चेंडू इकडे आपल्या कोर्ट मध्ये घेऊन येणाऱ्या.

## ३७. अद्रकवाली चाय.

सरती दुपार. एक टपरी. दोन मित्र. ऑफिसमधला ब्रेक टाईम. कामाचं टार्गेटचं टेन्शन.

" पप्पूसेठ, दोन कटिंग दे रे. "

मित्रांमधला एक जण ऑर्डर देतो. तिकडे चहाची किटली स्टोव्हवर चढते. गप्पा चालू असतात. मधेच चहावाला काहीबाही बातम्या, थोडं इकडचं तिकडंचं बोलतो. चहा येतो. मस्त आलं गवती चहा आणि खास राजस्थानी चहा मसाला घातलेला पीवर दुधाचा चहा. आहा. ते गरम अमृत घशाखालून उतरत जातं. ऑफिसच्या कामाचा आलेला थकवा फटिग वीरू लागतात.

समोर बांधकाम चालू आहे. इथेतिथे बांधकामाचं सामान सळया, खडी वाळू पसरलेले. तिथेच शेजारी पत्र्याच्या चार शेड्स उभारलेल्या. दुपारच्या उन्हाने पत्रे तापलेले आता थंडाव्याच्या प्रतीक्षेत असलेले.

शेड बाहेर बसलेलं, फाटकी चड्डी, विटका टीशर्ट घातलेलं पोर मातीचे किल्ले करतंय, बाजूला काटक्या लावतंय. आपल्याशीच मनमग्न काहीतरी बोलतंय. मधेच गुणगुणतंय सुद्धा. शब्द नाहीयेत पण भावनांचा ओथंब दुथडी भरून वाहतोय.

अर्धवट झालेल्या बांधकामाच्या डोलाऱ्यातून तिशीचा एक बाबा बाहेर येतो. त्या फाटक्या चड्डीवाल्या पोराचा बाबा. चहा पिणाऱ्या मित्रांना आता हे चेहरे, हे दृश्य परिचयाचे झालेले. बाबाची दाढीची खुंटं वाढलेली, कितीक दिवसात ब्रश फावडं न लागलेली. कुडी तर अशी बारीक कि चहेऱ्यावरची हाडं आणि त्वचा यामध्ये मांसाचा अंशही नाही. बाबा आपल्या तंद्रीत निघालेला. कदाचित दुपारची चार क्षण विश्रांती आणि बिन साखर बिन दुधाच्या घोटभर चहाचं फुळुक पाणी आटोपून निघालेला. आणि बाबाचं लक्ष जातं किल्ले रचणाऱ्या आपल्या पोराकडे.

बाबा त्या पोराला खुणेने आपल्या जवळ बोलावतो. पोरगं गळकी चड्डी सावरत धावत येतं. टाचा उंचावून बाबाच्या बरोबरीत यायला बघतं.

बाबा वाकून त्याची पापी घेतो, पोरगं त्याच्या गळयाला मिठी घालतं. दोघांचे मळकेधळके चेहरे आनंदाने भरून वाहतात. शब्दांची गरजच पडत नाही. खूप काही सांगून खूप

काही बोलून झालेलं असतं. या मनीचं त्या मनी पोहोचलेलं असतं. आणि सोबत एक अतूट विश्वासाचा धागा गुंफला गेलेला असतो.

बाबा जातो. तो वळणावर दिसेनासा होईस्तोवर पोरगं त्याची पाठमोरी आकृती बघत राहतं. बोलक्या टप्पोर डोळयांनी बरंच काही टिपत राहतं.

दुपार सुरू लागलेली असते, उन्हाचा ताप निवू लागलेला असतो.

खरंतर पोराला छप्पर नसतं, ना घराला नक्षीच्या चौकटी.

बाबा थ्री-पीस मध्ये नसतो कि नसते हातात मर्सिडीजची चावी.

तरीही सुख आणि आनंद तिथेच आसपास थुईथुई नाचत असतात.

कोणाच्याच कपाळावर भूत भविष्य वर्तमानाच्या चिंतांचे जाळे नसते.

बांधकामाचं रुक्ष सामान आणि पत्र्याच्या तापलेल्या भिंती बापलेकाच्या भावनांच्या आड येऊ शकत नाहीत.

सुखदुःखाच्या व्याख्या करण्याच्या फंदात कोणी पडत नाही.

त्या क्षणी ते दोन जीव पृथ्वीतलावरचे सर्वात श्रीमंत जीव असतात.

आणि टपरीवर प्यायला जाणारा चहाचा पुढचा घोट अम्मळ जास्तच गोड झालेला असतो .

एकूणच सगळा शीण वाहून गेलेला असतो. सुखाच्या नव्या व्याख्या आपोआप लिहिल्या जात असतात.

खुशीत आलेला मित्र जोरात सांगतो " पप्पू सेठ, और दो कटिंग, मस्त अद्रक मारके "

## *३८. बाबाची बेटी.*

आता हे दिवसभर असं होत राहिलं, डोळे ओले होत राहिले तर काम करणं अवघड होऊन बसायचं.

मध्ये कोणीतरी म्हणालं कि आपल्या खाजगी गोष्टी पब्लिक का करायच्या. पण ते एका वाक्यात सांगण्यासारखं नसतं ना.

आपल्या आनंदाचे, सुखदुःखाचे, भावनांचे किती केवढे कवडसे आसपास पडलेले दिसत राहतात. मधेच कोणीतरी म्हणून जातं, ओह तुझ्या आणि तुझ्या भावाच्या किती सवयी सारख्या आहेत, अगदी फोनवर भरलेला हुंकार सुद्धा किती एक जैसा आहे. आतून खूप नाजूक खूप छान वाटून जातं.

मैत्रिणीचे बाबा नव्वदाव्या वर्षी गेले. त्र्याणव वर्षाचे काका अजून आहेत आणि हिंडते फिरते आहेत. मैत्रीण सांगत होती, काकांकडे गेले कि मी त्यांचा सुरकुतलेला हात हातात घेऊन बसते, आणि मला बाबांचा स्पर्श आठवतो.

आपलं माणूस किती शोधत राहतो आपण इथेतिथे.

हेच ते आरसे जिथे मला माझं प्रतिबिंब दिसत राहतं म्हणून खूप आपल्यांबरोबर असे क्षण वाटताना वेगळी गोडी, मधुर सुखाच्या यातना वाटून जातं.

मोठा काका यायचा तेव्हा मी त्याच्या अनेक लकबींमधून माझा बाबा शोधत राहायचे. धाकट्या काकाचे हातपाय, डोळे बघताना बाबा दिसत राहतो. काका आला कि आम्ही हसतो खिदळतो, वयं विसरून थट्टा मस्करी करतो. पण हे सगळं करताना माझे डोळे काकाच्या हातांकडे, लांबसडक बोटांकडे बघत असतात, अगदी असेच हात.... अशीच बोटं होती बाबाची. काकाचे हसताना बारीक होणारे डोळे मला चाळीस वर्ष मागे घेऊन जातात. फार अवघड होऊन बसतं मग वर्तमान आणि चाळीस वर्षामागच्या धाग्यांची जुळवाजुळव करणं. मी धडपडत राहते या दोन बिंदुंमध्ये.

आज मुद्दाम गोडाचा शिरा केला. समस्त गानू मंडळींना आवडणारा. बाबा असता तर ८६ वर्षाचा असता, त्याला आवडला असता ना शिरा.... साजूक तुपातला, सत्यनारायणाच्या प्रसादासारखा मिट्ट गोड मऊ ओला.

ठरवलंय सारखं डोळ्यात पाणी आणायचं नाही. एकतर नजर धूसर झाली कि समोरचं काही दिसेनासं होऊन बसतं. बस झाला हा बालिशपणा.

बालिशपणा?...... हं बाबा कधीच नावानी हाक मारत नसे, कारण बाबाची लेक त्याची बेटी होती.

बेटी.

चाळीस वर्ष झाली हि हाक ऐकून. आज हे असं काय होतंय! ठाऊक नाही.

हीच ती वेळ होती, बेटी शाळेत जायला निघाली होती आणि फोन आला..... मुलांना घेऊन लगेच इकडे या.

मुलांना तिकडे घेऊन जाईस्तोवर सगळं संपलं होतं. अगदी ' बेटी ' हा हाकेसकट सगळं.

## ३९ बरकतवाले हाथ.

आमच्या ऑफिसमध्ये फुलं / हार देणारा महाराज उर्फ प्रकाश कोणत्याशा तीर्थक्षेत्री जाउन आला.

स्टाफ मंडळींना गंडे दिले (घातले नव्हे, दिलेच), त्यांच्या कपाळावर काडीने केशरी गंध लावले. माझ्या समोर येऊन उभा राहिला, मी या प्रकारांमध्ये नसते ठावूक असूनही नेटाने मला गंडा ऑफर केला. तो मी अर्थातच नाकारला, म्हंटलं, तुमको तो पता है ना इंसानमें भगवान ई ई ई. तो हसला, त्याला रागबीग नाही आला.

हा पहिला अध्याय संपल्यावर त्याने फिक्समध्ये पैसे ठेवण्याबाबत चौकशा केल्या.

कोरी स्लीप माझ्या हाती ठेवली, भरून द्यायचा फॉर्महीसुपूर्द केला ( म्हणजे मी या दोन्ही गोष्टी भरून देणार हे टेकन ऍझ ग्रांटेड )आणि सरमिसळ नोटा असलेलं पैशाचं पुडकं सुद्धा दिलं.

माझ्या शेजारची कॅशियर म्हणाली "स्मिता मॅडम बिझी आहे, दे मी घेते पैसे "

त्याने मान हलवून नकार दिला.

ती म्हणाली "अरे दे, मी मोजते कि किंवा फॉर्म तरी भरून देते. दे आन इकडे. "

हातातलं पुडकं सावरत तो म्हणाला " नहीं, नहीं मै मेडमकोही पैसा दुंगा, उनके हाथमे बरकत है, उनके हाथमे देनेसे पैसा डबल होता है "

माझ्या कर्मा, काय करावं अशा वेड्या माणसांचं? सहा आणि सात टक्क्यांच्या वर बरकत कुठून आणू बाबा मी!

आणि अरे पैसे दुप्पट होत असते तर पहिल्या दिवशी एक पैसा, दुसऱ्या दिवशी लाव त्याला हात - दोन पैसे कर

तिसऱ्या दिवशी चार पैसे लाव हात कर डबल, लाव हात कर डबल करत तिसाव्या दिवशी पन्नास लाख मी माझ्याच खिशात खुळखुळवले असते कि!

करा पस्तीस वर्षाच्या नोकरीचा हिशेब. कशाला ही खर्डेघाशी करत बसले असते!

असो पण प्रकाशने काही क्षण का होईना मला पैशात लोळल्याचे स्वप्न तरी दाखवले.

पुढच्या कस्टमरने कौंटरवर टकटक करेपर्यंत मी माझ्या बरकतयुक्त हातांकडे बघत राहिले.

इंसानमें भगवान वगैरे तत्वज्ञान झाडत होतीस काय? हा हा हा....... आपलेच तत्वज्ञान आपल्यावर बुमरँग होऊन आदळते ते असे.

## ४० तरंग आणि बुलबुलतरंग.

अजिबातच ऐपत नव्हती. मोठं आजारपण सोसून बाबा गेलेला, डोक्यावर कर्ज. दोन मुलांचं शिक्षण बाकी.

बाबाच्या जागेवर नोकरीला लागलेली आई. फी, कपडे, खाणेपिणे. घरभाडे इ इ इ इ. खर्च आ वासून उभे. येणारा पैसा आणि जाणारा पैसा यांची मिळवणी करताना होणारी त्रेधा. मुलं अर्धवट वयातली. आईच्या परिस्थितीची कल्पना असून पूर्ण कल्पना नसणारी.

आणि एक दिवशी एक लांबुळका खोका, सोबत खांद्याला पर्स, हातात भाजीची पिशवी आणि नेहमीचा थकवा घेऊन आई घरी आली.

काहीच न बोलता माझ्या हाती खोका दिला.

पूर्वी कधीतरी बाबा असताना झालेलं बोलणं. खूप स्वप्न आणि खूप प्रॉमिसेस त्या त्या वेळच्या वर्तमान काळाशी सुसंगत. भविष्याबाबत तद्दन अजाण स्वप्नं.

एस. एस. सीला फर्स्टक्लास मिळाला तर रिस्टवॉच घेऊन देईन असं बाबा पूर्वी कधीतरी म्हणाला होता. त्या काळी फर्स्ट क्लासचं महत्व होतं आणि शब्दाला किंमत होती.

कोणताही क्लासबीस न लावता बाबाच्या लेकीनं डीस्टिंगशन मिळवलं. बाबाचा शब्द आईनं पक्का ध्यानात ठेवला होता आणि त्याच आठवड्यात पगार झाल्या दिवशी 'एच एम टी सौम्य'. हे सुबक सुंदर घड्याळ आईनं लेकीच्या हाती ठेवलं. त्या घड्याळानं वेळ आणि शब्द पाळायचं भान दिलं.

दिवस चालले होते. वर्ष सरत होती. आणि हे नवीन.

हे काय. हा खोका कसला?

उघडून पाहिलं तर त्यात बुलबुलतरंग. आह!! हे स्वप्न आहे कि खरेखुरे तंतू.

काहीतरी हवं आहे हे शब्द कधी ओठांपर्यंत येऊ शकतच नव्हते... कारण परिस्थितीची जाणीव होती. घरात बाबाच्या वेळचा जुना रेडिओ होता आणि त्यातून अहोरात्र गुंजणारे विविधभारती, रेडिओ सिलोन आणि जोडीला उमटणारी गुणगुण घराच्या परिचयाची.

आणि आज हे सुंदर सरप्राईज.

प्लास्टीकची हार्टशेप्ड गुलाबी चकती काढली आणि सहज तारांवर फिरवली. तो टणत्कार थेट काळजाच्या आत झंकार छेडून गेला.

बोटं एक एक एक करत बटणांवर.... डावी कडून..... उजवीकडे.. अजून उजवीकडे. पहिले ते शेवटचे बटन, प्रत्येक स्वराशी हातमिळवणी करत जानपहचान करून घेतली.

क्या बात.

खरं आहे हे सगळं... स्वतःलाच सांगितलं. कारण हा स्पर्श हे स्वर खरेखुरे आहेत.

सुरांचे ज्ञान मिळवण्याचा अर्थातच कोणताही प्रयत्न केलेला नव्हता. पण डोक्यात काहीतरी असावे कदाचित.

आणि एक हाताची बोटं कीजवर दुसऱ्याने तारा थरथरणाऱ्या.

"क्या उमर थी.. क्या समा था.. क्या जमाना था "

"रमैया वस्ता वैया...... "

"ये मेरा दीवानापन है "

"घर आया मेरा परदेसी "

बटणांशी खेळत वाजू शकणारी गाणी आपोआप एकातून एक उमटत गेली.

सोबत दिलेले " गाणी कशी वाजवावी " पुस्तक उघडायची वेळच नाही आली.

" क्या यही प्यार है....... हां यही प्यार है..... दिल तेरे बिन कहीं लगता नही... वक्त गुजरता नहीं..!!

आई गं.... किती आवडतं गाणं.. होय खरंच वाजतंय आपल्या बोटांमधून आणि मनामधून...... उमटणारे स्वर तुटक होते, पण तुटक नव्हते...!!

हां.. हां यही प्यार है. जगण्याबद्दल.

कधी बोलून दाखवण्याची वेळ नाही आली,

पण, हां यही प्यार है.

बुलबुलतरंग आणि सोबत बऱ्याच निःशब्द भावना मांडणाऱ्या त्या बाईबद्दल.... आईबद्दल--- हां यही प्यार है.

## ४१ सचिनची सखी.

सचिन. एका मोठ्या बिल्डर ऑफिसची कामं बघणारा साधा सरळ सिन्सीअर लाघवी मुलगा. किंचित अबोलसा. आम्ही विचारलं तरच वैयक्तिक गोष्टींबद्दल बोलणारा. पोरसवदा बाबा.

नेहमीच्या कामासोबत होणाऱ्या गप्पांमधे त्याच्या मुलीचा सखीचा उल्लेख असतो. काल सहज विचारलं " काय म्हणते सखी "

सचिनच्या चेहेऱ्यावर छोटं हसू पसरलं " मस्त आहे मॅडम "

" फोटो आहे का रे, दाखव कि "

झटकन मोबाईल चमकला " हं, हि बघा मॅडम "

वय दीडेक वर्ष.

एक बंडखोर गुंड बाळाचा मस्त फोटो होता.

"काय रे, गुंड असेल ना एकदम, फुल मस्ती... हं!"

बस एक प्रश्न आणि सचिनच्या चेहऱ्यावर प्राऊड बाबावाले जे उबदार भाव आणि डोळयात टिपीकल बाबावाली जी चमक आली ना कि बस रे बस. आणि मग तो एरव्ही अबोल असणारा बाबा टिपिकल ' लेकीचा बाबा ' मोडमध्ये जात फक्त आणि फक्त सखीबद्दल शब्दांतून डोळयांतून बोलू लागला.

या अशाच नाजूक क्षणांनी आपला सभोवताल मस्त होऊन जातो. कोणी कोणाला काही देत नाही घेत नाही तरीही सुंदर देवाणघेवाण चालू राहते.

## *४२ गाडी बाबांकडून शिकेन.*

गाडी शिकायची आहे... धोशा लावून मनाली थकली. आज उद्या करत एकेक दिवस सरत होता. मग एकदाचा बाबा तयार झाला, गाडी शिकवायला.

पण आता मनालीने निराळाच सूर लावला. आई प्लिज, बाबाकडून मी नाही शिकणार बरं का.

अगं पण!

नाही, तो शिकवण्याआधी घाबरवायलाच सुरुवात करतो, मी माझ्या वर्गातल्या अमितकडून शिकेन. आणि बाबा एवढी स्लो गाडी चालवतो कि फ्रस्ट्रेशन येतं.

मनाली थोडं शांतपणे विचार कर बाळा. पन्नाशी /साठीच्या आसपास असलेल्या आपल्या आई किंवा बाबाच्या ड्रायव्हिंगवर हसण्यापूर्वी किंवा खोचक शेरा मारण्यापूर्वी फक्त एकदा विचार करायला नको का. कितीही नाही म्हंटलं तरी दृष्टीत किंचित तरी फरक पडलेला असतो, पन्नाशीसाठीच्या आसपास रिफ्लेक्सेस मंद झालेले असतात, पडलो तर स्वतःला सावरू शकू किंवा नाही याबाबत मन साशंक झालेले असते, त्यामुळे कोणे एकेकाळी "ह्या त्यात काय मोठं" म्हणत अगदी तुमच्याच सारखं झूSSम मध्ये तुमचे आईबाबा सुद्धा गाडी चालवत होते हे विसरू नका.

अगं पण आई, आम्हाला स्पीडची झिंग असते आणि हे असं गुळमुळीत ड्रायव्हींग बघून....!

तुमच्या वयाच्या चौथ्या पाचव्या वर्षी, बाबाच्या पोटाला मिठी मारून टू व्हीलरवर मागच्या सीटवर बसून " बाबाSSSS आणखी फास्ट, अजूSSSन जोरात " म्हणतानाचा तुमचा आवाज, भुर्रर्र उडणारे तुमचेच केस आणि मुळात आई / बाबासोबत चक्कर मारायला जायचं या कल्पनेनेच लुकलुकू लागलेले डोळे आणि त्या डोळयात दाटलेलं सुपरमॅन बाबासाठीचं प्रेम फक्त आठवून बघ जरा. आणि बाबा सूचना देतो ते तुझया भल्यासाठीच ना गं.

हं म्हणत मनाली आपल्या खोलीत गेली.

रविवार सकाळ आणि एक वेगळी फ्रेश फ्रेश नवी मनाली समोर आली.

मनाली : बाबाssssss, आज तुम्ही मला ड्रायव्हींग शिकवायला सुरुवात करणार आहात.

आईबाबाची नजरानजर आणि आईच्या डोळयात कौतुकाचं पाणी.

चला गाडी मार्गी लागली. गोष्टी छोट्याच असतात आणि समजावून सांगितलं तर कळणाऱ्या सुद्धा.

## *४३ परंपरा द बुटीक.*

घरकुल किंवा कोणाची तरी कृपा वगैरे नाव शोभावं अशा टाईपचं घर. शहरात असूनही शहरातलं नसावं असं. साठ सत्तर किंवा त्याहूनही जास्त वर्ष वयाचं. घरावर इतक्या वर्षात कधी नाव कोरलं गेलं नव्हतं, घराला त्याची गरजच वाटली नसावी तरी पंचक्रोशीत त्याचा उल्लेख लँडमार्क म्हणून केला जाई.

घर आगेमागे नारळीची आंब्याची अनंत सोनचाफा वगैरे झाडं चिकाटीने जपत राहिलेलं. लाकडी जिने खूप काही पाहिलेले. छोटीशी विहीर, पालापाचोळा जरी झाला तरी ओलावा अजूनही धरून असलेली. घर गावासारखं पण गावचं नाही आणि शहरात मात्र उपरं होऊन बसलेलं. काळाच्या प्रचंड वेगाशी जुळवून घेण्यात कुठेतरी कमी पडलेलं जणू.

पण घर होतं. 'घर' होतं. शांत संयमी घरांना अस्वस्थतेचा शाप लागावा किंवा कोणाची दृष्ट लागावी तसं काहीतरी घडलं.

ती आली. परदेशातून नव्या युगाचं नवीन काहीतरी शिकून म्हणे, ज्यात भरपूर पैसा होता प्रसिद्धी होती आणि क्रिएटिव्हिटी होती. आजवर घर त्याच्या संथ लयीत गुणगुणत होतं, त्याच्यासाठी हे क्रिएटिव्हिटी वगैरे शब्द अगदीच अनोळखी होते. तर ती आली आणि तिची नजर नेमकी या घरावर पडली. मग काय तिचं मनच जडलं म्हणे या वास्तूवर.

कागदी डिग्र्यांची खूप खूप भेंडोळी गाठीशी असलेल्या तिने मग ते घर जमिनीसकट झाडांसकट हवेसकट पाण्यासकट घेऊन टाकलं तिच्या बुटिकसाठी. आता सगळयावर तिचा हक्क शाबीत झाला.

डिझायनर विचारांची ती आणि डिझायनर तिचा व्यवसाय. बघता बघता असत्याचं नसतं होऊन गेलं.

घरातली उरली सुरली माणसं कुठे गेली किंवा घालवली गेली कोणास ठाऊक. वळचणीचं चिमणीचं घरटं नेस्तनाबूद झालं. घरट्यात पिलं नुकतीच चिवचिव करू लागली होती असं जाणारा येणारा कोणीतरी पुटपुटला.

मग तिने, जिने सगळे हक्क विकत घेतले होते, सगळं सपाट केलं..... म्हणजे घरासोबत झाडांसोबत झडझडून सगळंच अगदी मातीचं सुद्धा नामोनिशाण मिटवत.

आणि रस्टी लूक असलेलं नवीन काहीतरी उभारलं. सारवल्यासारखी नक्षी असलेली लादी निवडली, झावळयांचं आच्छादन घातल्यासारख्या डिझाईनच्या भिंती, जिना सुद्धा खास लाकडी 'खानदानी' बनवून घेतला, दारं कडी-कोयंडेवाली पारंपरिक पितळी वाटणारे, हत्तीची मोराची नक्षीवाले. बाहेर शो पीस म्हणून घंगाळ, जातं, पाण्याचा बंब काय नि काय. सजावट भारी झाली. शेवटी उच्च प्रतीची प्लास्टिकची फुलझाडं लांबून कुठून तरी मोठ्या सायसानी मागवली तीच कथा कृत्रिम लॉनची आणि पानाफुलांमधून मुद्दाम वाहणारे सुगंधी द्रव्य तर परदेशातून आणवले.

बघणारे कौतुक करतात तिच्या पारंपारिक टेस्टचं. क्या बात सहज उमटतं बघणाऱ्यांच्या नजरेतून, अगदी म्हणजे अगदी जुन्या वातावरणात नेल्याची पावती मिळते तिला आणि ती धन्य धन्य....... अभिमानाने मिरवणारी.

बुटिकचं नाव मात्र ती शोधतीये अजून 'द परंपरा'..... 'संस्कार' 'किंवा 'द नेटिव्ह' अथवा 'the habitat' टाईप्स काहीतरी भारीवालं.

क्वचित रस्त्याने एक जोडपं जातायेता थांबतं, बारीक डोळयांनी अनंताचं झाड आणि फुलांच्या गंधाचा शोध घेतं.

आणि उद्वस्त घरटं कुठे गेलं हे न उमगलेली चिमणी तिथेच घिरट्या घालत. जुनी ओरीजनल भांडी मातीमोलात मिळाल्यानं खूश झालेला भंगारवाला अजूनही ईथेतीथे रेंगाळताना दिसतोय.... त्या जोडप्या सारखं, त्या चिमणी सारखं.. ओरिजनल शोधत.

प्लास्टिकची फुलं मात्र दृष्ट लागावी अशी मिळू लागलीयेत बाजारात, खऱ्याखोट्यातला फरक न कळणाऱ्या नादान जगात.

## *४४ श्रीमंत भंगारवाला.*

भुरभुर पाऊस पडून गेला होता. रस्ते ओले ओले. एका काखोटीला ऑफिस बॅग, दुसऱ्या हातात छत्री, आसपासच्या वाहनांमुळे उडणारा चिखल सावरण्याची त्रेधा आणि त्याच वेळी खड्डे चुकण्याची कसरत. ऑफिसमध्ये आज निम्म्या स्टाफच्या जीवावर दिवस खेचायचे टेन्शन. अमुक वाजायच्या आत पोहोचायला हवे..... नेहमीचे तिरकीट धा चालू.

खरंतर मस्त मगन मोकळया हवेत छत्रीबित्री न घेता हुंदडायला जावं असा मूड होता.

पाऊस थांबलेला. माहोल भिना भिना. कुठेच बघायला वेळ नव्हता तरीही लक्ष गेलंच.

भंगारवाला तो, रस्त्याच्या कडेला त्याची भंगाराची लांबडी गाडी लावून त्याच गाडीत लवंडला होता. कालच्या गोळा केलेल्या भंगारातलं छुटपूट काही गाडीत पडलेलं त्यातच हा एक. बाजूच्या एवढ्याशा यंत्रातून गाणं वाजत होतं " समा है सुहाना सुहाना " भंगार बाबाच्या बाजूला हिरवंगार ओलेतं झाडं, मधूनच त्यातून गळणारा एखाद थंडगार थेंब, मस्त हिल स्टेशनवाली मत्त हवा. त्या बाबाची लागलेली ब्रम्हानंदी. भोवतालचा पडलेला विसर. मला वाटतं तो स्वतः त्या गाण्याबरोबर गुणगुणत होता. हं खरंच की!

त्याच्याकडे बघताना आणि बाजूचं वाहन चुकवताना पर्स गच्च पोटाशी चेपली. काहीतरी टोचलं. आह ऑफिसची चावी. आणि मी खटकन भानावर आले. एका अजाण असूयेने मन भरून गेले.

या क्षणी खरा श्रीमंत कोण होता....... मस्त गार वाऱ्यावर गुणगुणू शकणार भंगारवाला..... की अमुक वाजायच्या आत ऑफिससाठी धावणारी ऑफिसवाली बाई!

हं....... प्रश्न प्रश्न आणि त्याची आपणच अवघड करून घेतलेली, मूळात सोपी असलेली उत्तरं.

---

## ४५ आम्हीही रेटलं असतं.

लेकीच्या बाळंतपणाला आलेली आई उर्फ बाळाची आजी.

नवं नवं तान्हं बाळ किरकीरं.

क्रीटीकल बाळंतपण आणि कावलेल्या मायलेकी.

बोलता बोलता आजी म्हणजे बाळंतीणीची आई म्हणाली " आम्ही सगळं एकट्या हाती केलं, असं कोणी दिवसरात्र मदतीला किंवा सोबतीला नव्हतं हो "

बाळाची आई पटकन म्हणाली " तेव्हा कोणी नव्हतं तुमच्या आसपास म्हणून अपेक्षा केली नाही, परिस्थिती तशी होती म्हणून रेटून नेलंत, इथे कोणी नसतं आणि आमच्यावर वेळ आली असती तर आम्ही सुद्धा हेच केलं असतं "

आजीला प्रचंड राग आला. ती स्वतःच्या कठीण दिवसांचं वर्णन करता करता त्या दिवसांच्या मधुर सुखाच्या यातनांबद्दल बोलत होती आणि हि पंचवीशीतली पोर प्रॅक्टिकलपणाचे धडे द्यायला निघालेली. ही का रीत झाली बोलण्याची, म्हणजे आम्ही एवढं सोसलं त्याचं काहीच नाही!

खरं तर आपापल्या जागी तिघे बरोबर होते.

आजी, बाळंतीण बाई आणि कीरकिरं बाळ सुद्धा.

प्रत्येक जण आपापलं जगणं जगत होतं.

हे असंच तर होत राहतं आयुष्यात पदोपदी. चष्मे निराळे असतात म्हणून दिसणारी दृश्य निराळी दिसतात आणि दुर्दैवानं त्या चष्म्यांची अदलाबदल करायची राहून जाते.

गोष्टी छोट्याच असतात पण सापेक्षतेचे सिद्धांत लेवून समोर येणाऱ्या

## ४६ श्रद्धा अंधश्रद्धा ज्याच्या त्याच्या

विज्ञानावर पूर्णपणे आधारलेलं यान मंगळावर सोडताना आमचे थोर लोक मोठ्या देवाच्या पाया पडतात, त्याला साकडं घालतात.

आम्ही वाचतो आणि म्हणतो ...असो.

गगनचुंबी इमारतीत राहणारी, उच्चभ्रू सुशिक्षीत वगैरे बाई एकविसाव्या मजल्यावरून सूर्यासारख्या सूर्याची पूजा करताना त्याला बुडकुलंभर पाण्याचं आमिष दाखवते आम्ही बघतो, किंचित हसतो आणि पुन्हा म्हणतो ......... असो.

एकूण आम्ही 'असो' म्हणतच जगत असतो.

असो.

तर झालं असं, सकाळी ऑफिसला नेहमीप्रमाणे चालत निघाले. भंगार गोळा करणारा एक जण समोरून येत होता, आमच्या साधारण मधून एक मांजर जात होतं, आपल्याला मांजरच काय मांजराचा भाचा वाघोबा गेला तरी काही फरक पडत नाही, उलट आपल्या आडवे जाण्यानं पडलाच तर त्या मांजराला फरक पडू शकतो अशा विचारानं मी शांतपणे पुढे चालत राहिले मात्र भंगारवाल्याने ते मांजर आता आडवे जाणार हे जाणले आणि काहीसा विचार करून त्याने आपली चालण्याची गती कमी केली, रेंगाळत चालू लागला. त्यानं मनात हिशेब केला कि समोरून येणारी ही बया म्हणजे मी मांजराने भ्रष्ट केलेल्या 'त्या' रेषेवरून पार झाली कि मग आपण पुढे जावं. दिवसभराची नसती नाट लागायला नको.

मला त्याचा इरादा लक्षात आला, आपल्याला यातलं काहीच जाणवलेलं नाही असं भासवत मी त्या मार्जारिक रेषेवरून चालत पुढे गेले, गंमत आणि कुतूहल म्हणून हळूच वळून पाहिलं तर त्याने जणू सुटकेचा श्वास सोडला असावा अशा रीतीनं तो भरभर चालू लागला.

प्रश्न अंधश्रद्धा / अंध समजूतींचा नसून, त्या व्यक्तीसाठी ती मान्यता किती महत्वाची आहे याचा आहे. पहिल्या दोन उदाहरणांमध्ये केवळ जपायच्या म्हणून जपल्या जाणाऱ्या समजुती किंवा कोणीतरी करतं म्हणून आपण करायच्या अशा गोष्टी कारण मीमांसा समजून न घेता केल्या गेलेल्या, या बाबाच्या बाबतीत मात्र मी अपवाद ठरवल्या.

माझ्या घरावर छप्पर आहे, उद्या काय हि चिंता करायचं मला कारण नाही, मात्र त्या भंगारवाल्यासाठी त्या त्या दिवसाचं काम आणि त्या नंतर मिळणारा पैसे त्या दिवसासाठी अनमोल आहे. त्याचा धंदा भंगाराचा धंदा म्हणून कोणी त्याला 'मोडीत' काढू शकत नाही.

तेव्हा म्हंटलं, चल बाबा ते बालंट / ते अभद्र मी घेतलं माझ्या डोक्यावर, तू निघ बिनधास्त

आणि तुला आजच्या दिवसात खूप 'समृद्ध भंगार' मिळो ही सदिच्छा. असो.

गोष्टी छोट्याच असतात पण अमंगळाला सुद्धा मंगल करून टाकणाऱ्या.

---

## ४७ सुजाण माय.

शक्यतो तो नको म्हणून दुसऱ्या रस्त्याने जाणारे अनेक. आपण मात्र नेमका तोच रस्ता पकडून जायचं. जग करेल त्यापेक्षा काहीतरी वेगळं. मुद्दाम करायचं म्हणून नव्हे तर आपोआप घडणारं.

तीच ती वस्ती, वस्तीतल्या झोपड्या. तिथल्याच कोण्या झोपडीवाल्यानं गोळा केलेले भंगार-रद्दीचे ढीग, वाटेत नाचणाऱ्या बेशिस्त बेगुमान कोंबड्या , खोपटाबाहेर झोपलेले खंगलेले देह वगैरे आणि संपूर्ण वातावरणात भरून राहिलेला एक अस्वच्छ गंध.

अगदी रोज. सकाळी पावणेसहा ते साडेसहाच्या मध्ये कधीही इथून जाणंयेणं.

झोपडपट्टी संपताना लगेच टॉवर सुरु होतात. त्या टॉवर्सच्या कंपाउंडपाशी मेमसाहेबांच्या आळसावलेल्या पोरांना घेऊन नोकराण्या किंवा पोरांना सांभाळणाऱ्या 'आया' स्कूल बसची वाट बघत असतात. त्यांच्या दोन्ही हातांमध्ये जडच जड साहित्य. पोरं पारोशा चेहेऱ्यानं शिक्षा केल्यागत उभारलेली. झोपडीपट्टीच्या या टोकाला काही मुलं शाळेत जायची तयारी करून निघण्याच्या बेतात असतात . कोणी प्लास्टिक ग्लास मध्ये पाव बुडवून खात असतं. कोणी नुसताच मिट्ट काळा चहा पीत असतं.

रोज भेटणारे काही ओळखीचे चेहरे.

काळी कळकट तेलगु जाडी बाई. तरंगणारा गाउन, अस्ताव्यस्त देह, केस, कपडे.

तिच्या हाताशी असते एक बारकीशी पोरगी जिच्या तेल लावून दोन घट्ट वेण्या घातलेल्या असतात. पोरीला तयार करणं म्हणजे चक्कीतल्या डब्याला पिठाची आंघोळ घातल्यागत पावडर लावणं असं त्या आईच समीकरण असावं. भसाभसा पावडर लावल्यामुळे चेहरा पांढरा आणि बाकी देह सावळा. पोरीच्या पाठीला दप्तर असतं.

रोज तिला सोबत म्हणून एक इवलं कुत्र्याचं पिल्लू सुद्धा नेमाने तिच्या बाजूबाजूने चालत असतं.

शाळेसाठी थांबलेली मुलं, या टोकाला, त्या टोकाला.

त्या टोकाच्या मुलांचं तेवढं कौतुक वाटत नाही. त्यांना, टेबल खुर्च्या लेपटोप, लेखण्या मिळणारच आहेत.

या टोकाच्या मुलींना लेखण्या मिळायला हव्यात.

मला वाटतं त्या काळया बाईला एक छान मिठी द्यावी, म्हणावं बाई तू भारी आहेस, पोरीला शाळेत धाडतीयेस.

सुटू नयेत म्हणून जशा तिच्या वेण्या घट्ट खेचून बांधल्या आहेस, तसेच हे शिकण्याचे पेड सुद्धा सुटू नयेत असे घट्ट धरून ठेव. त्या मुलीच्या दप्तरात नेमकं काय असतं यापेक्षा तिच्या अंगावर युनिफोर्म आणि पाठीवर दप्तर असतं ही गोष्टच डोळयांना, मनाला सुखावणारी असते.

टॉवरमध्ये जन्माला आली नाही म्हणून खंत करण्यापेक्षा, या आईच्या पोटी जन्माला आल्याचा त्या घट्ट वेणीवाल्या पोरीनं आभाळभर अभिमानच बाळगावा... नाही का!

## *४८ वाडी आणि बरंच काही.*

वाडी आणि बरंच काही.

मी बघत राहिले दूर दूर जाणाऱ्या आकृत्यांकडे. आकृत्या...... पुढे त्यांच्या लांब लांब सावल्या उरलेल्या. नंतर जणू त्या सावल्याही लांब लांब जात दिसेनाशा होत गेल्या. सावल्यांच्या मागे धावणे, आकृती रेखाटणे, आणि त्या निरखत बसणे त्यावर कल्पनाविलास रचणे हा तर जीवाला जन्मापासून लागलेला छंद जणू. त्याच आकृत्या अनेक प्रकारच्या लांब रुंद त्रिकोणी चौकोनी आणि अनेक पदरांच्या आणि म्हणूनच त्यांच्या सावल्याही तशाच बहुरंगी बहुढंगी. कधी थेट पायाखाली लपून बसणाऱ्या कधी तिरप्या तिरप्या होत अलगद नजरेच्या कक्षेपलीकडे जाऊन दडणाऱ्या तर कधी असता असता न दिसणाऱ्या आणि दिसता दिसता गायब होणाऱ्या. सावल्यांचेही जणू झोके होतात, पहाट ते सकाळ, सकाळ ते दुपार, दुपार ते तिन्ही सांजा आणि पुढे तर गर्द भरत जाणारे निशेचे कवडसे आणि त्या त्या कलाने तशाच बदलत जाणाऱ्या सावल्या आणि त्यांचे हिंदोळे. कधी उत्तुंग आकाशाला भिडणारे तर कधी मोरपिसागत सलगी करणारे, कधी सहज कवेत येणारे तर कधी येता येता निसटणारे झोके... सावल्या... आकृत्या... सगळीच सरमिसळ.

सावल्या फिरायच्या, तसतसे आम्हीही फिरायचो. सकाळी कोवळी उन्हं खात बसायचो आणि पुढे त्याच उन्हाशी लपंडाव खेळत बसायचो. दुपारचा वाडीतला मुक्काम म्हणजे आमच्यासाठी एक सोहळाच असे, आनंद सोहळा. सकाळची शिपणं झालेली असायची तो मातीचा गाभारी वास आसमंतात भरून राहायचा. आमच्या आंघोळी आणि न्याहारीचा कार्यक्रम झाला कि दुपारच्या जेवणापर्यंत आम्ही वाडीत स्वच्छंद भटकत राहायचो. घरचा आणि शेजारच्या रहाटाचा येणारा आवाज वातावरण नादमय करून टाकत असे, मधेच गाई गुरांचे हम्बरणे, भरून राहिलेला चुलाण्याचा खमंग वास आणि माई अण्णा आणि इतर मोठ्यांचे सकाळचे उद्योग चालू असयचे. सुपारीची एखादी गारेगार अळी शोधून आम्ही त्यात नारळाचं किंवा सुपारीच पसरट होडक्यासारखं आसन टाकून बसायचो, कधी एखादे छानसे पुस्तक, कधी चक्क अभ्यासाचे साहित्य आणि बरेचदा गप्पा आणि फक्त गप्पा. मन नुसते थुई थुई नाचत राहायचे पाखरासारखे. उन्हे सरकत जात, तसे आम्ही ही आमची स्थिती बदलत राहायचो, आणि त्या

उन्हांसोबत आमच्या सावल्याही लहान मोठ्या होत सरकत राहायच्या, हाच तो सावल्या निरखण्याचा वेडाबागडा खेळ, जो पुढे आयुष्यभराचा सखासोबती होऊन राहिला.

कसल्या कसल्या गप्पा गोष्टी केल्या असतील आम्ही या वाडीत, मनातील केवढी गुपितं खुली केली होती बहिणी बहिणींनी. छोटी छोटी सुख दुख्ख, अगदी बालिश गमतीजमती, त्या वयात खूप अप्रूपाच्या वाटणाऱ्या खूप आपल्या अनेक गोष्टी अगदी आपुलकीने आणि विश्वासाने एकमेकांना सांगितल्या होत्या इथेच या वाडीत. आम्हा बहिणींमधले किती बंध बांधले होते याच वाडीने. स्वप्नाळलेल्या डोळयांची किती झाकोळ स्वप्ने एकमेकींच्या डोळयांनी पाहिली होती, दाखवली होती. म्हंटलं तर प्रत्येकीचं जगणं वेगळं होतं तरीही प्रत्येकीचं सारखं जग ही कुठेतरी याच जगण्यात होतं. वय वेडं होतं. मन कातर करणारं, हुरहूर उठवणारं ते भाबडं वय एक होतं म्हणूनच आम्ही एकमेकींना सांगितलेल्या इवल्या इवल्या गोष्टीही खूप काही सामावून होत्या स्वतःमध्ये, काही खूप तरल, हळवं खूप खास. आपल्याला आणि फक्त आपल्याला काही अवर्णनीय दिसलंय, मिळालंय असं वाटण्याचं ते वय होतं.

बरेचदा तर काहीच न बोलताही आम्ही एकमेकींशी संवादत राहायचो. हातात हात गुंफून, निर्हेतुक इथे तिथे भटकत राहायचो कधी देवळाच्या पारावर.. कधी वेळूच्या बनात..... कधी आकाश निरखत... कधी शेताच्या रेषांमधून.. तर कधी मोकळया मैदानात.... कधी बकुळी खाली तासंतास बसून राहायचो, तर कधी शांतपणे समुद्राची गाज कानात साठवत राहायचो... अगदी निर्हेतुक, निःशब्द... तरीही खूप काही संवादत..!

प्रत्येक वेळी शब्द असावेच लागतात असं कुठे! संवाद तर मनाचा मनाशी होतच असतो मने जुळली तर.

## *४९. माई आणि प्रकाश.*

दुपार सरू लागता माई सर्व कंदील घेऊन बसे, कंदील पूर्ण उघडून वातीवर जमलेली काजळी चिमटीत धरून निगुतीने काढून टाके. वातीला नव्याने स्वच्छ उजेड दाखवण्यासाठी मोकळी वाट करून देई. पण फक्त वात स्वच्छ असून भागत नाही कंदिलात इंधन काठोकाठ भरलेले असावे लागते, आणि ज्या पारदर्शक काचेतून तो प्रकाश सांडून बाहेर पसरणे अपेक्षित असते ती काचही तेवढीच लख्ख. मग माई त्या काचा राखुंडी लावून नंतर कापूस किंवा मलमलीसारख्या तलम कपड्याने अलगद पुसून घेई. सारी सिद्धता झाल्यावर माई तिरप्या नजरेने त्या कंदिलांकडे निरखून पाही.

जगणे ही असेच असते ना कंदीलासारखे! म्हणजे असावेच. जेवढा पारदर्शीपणा टिकून राहील, जगण्याकडे तिरप्या तरीही तटस्थ नजरेने बघता येईल तेवढे उत्तम. जेवढी काजळी कमी जमेल जेवढे समृद्ध सघन विचारांचे इंघन लाभेल आणि ज्योत लावण्याचे, ती पुढे कमीअधिक करण्याचे तारतम्य टिकून राहिल तेवढे जगणेही निर्मळ लख्ख होत जाईल.

हे साधले जाता उजेड अधिक फाकेल आणि सारं स्पष्ट होत पुढील वाटाही सुकर होऊन जातील. स्वतः सोबत इतरांना प्रकाशित करतील.

एकूण काजळी जमू न देणे आणि जमते असे वाटल्यास मऊ कपड्याने ती पुसून घेणे, पुन्हा दृष्टी निरभ्र करणे, म्हणजेच प्रकाशाकडे वाटचाल नव्हे काय!

माई, न बोलता तू तेव्हाही बरंच बोलायचीस. नसलीस तरी आजही तू आहेस अगदी इथे अगदी आसपास.

## ५० नितळ संगीत.

ती सुशिक्षित सुखवस्तू कुटुंबात वाढलेली मुलगी आहे. उत्तम वकील आहे. वाद्य वाजवते. छान गाते. निर्मळ आहे खुळी आहे या सगळया पेक्षा खूप जास्त महत्वाचं म्हणजे ती आपला खुळेपणा खुशाल एन्जॉय करते.

कसं?

वीकेंड्सना ती गाणं शिकवायला जाते. पिटुकल्या विद्यार्थ्यांचा क्लास तिच्या विशेष आवडीचा असतो ज्याची ती आणि तिची मुलं ( होय, तिच्या क्लास मधली मुलं तिची मुलं असतात)

क्लास सुरु होतो. हं, सा लावा.

छोटे गोड आवाज एकसाथ म्हणतात... सा sssss. मग रे येतं, मग ग, म, प, ध आरोह अवरोह.

मग गाडी पुढे निघते.

म्हणा...... ग प ग रे सा रे ध सा

ग _ ग रे ग प ध _. तिची मुलं तिच्यापाठोपाठ म्हणू लागतात. ग प ग रे सा रे ध सा

आणि पहिल्या रांगेतून नाजूक किणकिण उमटते.

एक पिट्टू " teacher, even my mom's name is Nehal "

गाणं थांबतं मात्र टिचरला आतून गंमत वाटत असते. वरकरणी ती त्या किणकिणाऱ्या जीवाला लटके दटावते.

शूsss ........ हं म्हणा " ग प ग रे "

गाण्यासोबत आनंदलहरी वाहत असतात.

त्यातल्या एखादया पिट्टूची वस्तू चुकून खाली पडली तर त्या इवल्या जीवाला त्रास नको म्हणून ती वस्तू हि मुलगी उचलून देते. हे करताना ती वाकली कि तो छोटा जीव निखळ

मनाने आपल्या दोन तळव्यात तिचा चेहरा धरुन पटकीनी तिची पापीबीपी घेऊन टाकतो. बरं हि कोण्या एकाची कथा नाही तर बऱ्याच जणांना याची लागण झालेली.

आणि टिचरला थँक्यू म्हणायची हि कोवळी पद्धत आवडल्याने आता हि वात्रट टिचर मुद्दाम वस्तू पाडते आणि भाबडया चेहऱ्यानं मुद्दाम वाकते. आणि ती वाकली कि मग तो मऊमऊ सोहळा.

सुंदर नाती. सुंदर जगणे.

बिनपैशाचे सोहळे. कोणी गरीब नसतो कोणी श्रीमंत नसतो. कोणाचं शिक्षण खानदान काही काही कुठे आड येत नाहीत. निव्वळ स्वच्छ नितळ नाती पारदर्शक वाहत राहतात. गोष्टी छोट्याच पण 'क्या बात ' वाल्या असतात.

***********************

## ५१. बाबा तू ऐकतोयस ना!

हं..... फादर्स डे.

आपल्याला कुठे रे डे वगैरे लागतात एकमेकांसमोर अभिव्यक्त व्हायला. आपला तर रोजचाच संवाद असतो. होय ना!

तुला गंमत सांगते बाबा. लग्न झालेल्या एखाद्या मैत्रिणीचा बाबा तिच्यासाठी काहीबाही घेऊन येतो, तिच्या हाती तो डबा किंवा पुडकं देतो, दोघे शेजारी शेजारी बसून मनाच्या गोष्टींची देवाणघेवाण करतात. मी माझ्या काऊंटरच्या आत एकटी बसून हा प्रेमसोहळा मनभर बघत असते, मैत्रिणीच्या जागी मी मला आणि तिच्या बाबाच्या जागी तुला ठेवून.

डोळयाच्या कडेपाशी आलेला एखाद थेंब पुसायला एक सेकंदच तर लागतं. तू नसतोस तरी तू असतोसच. आणि माझ्या मुठीत, माझ्या फ्रॉकच्या खिशात मी आपली बरीच गुपितं दडवून ठेवलेली असतात.

आत्ता मुठ उघडली तरी तो बिस्किटाचा पुडा तुला तसाच सापडेल त्यात, पण मी मुठ उघडणारच नाही, गेली बेचाळीस वर्ष जी झाकून ठेवलीये.

हातातली पिशवी हलवत मी तुझ्यासोबत बाजारभर फिरत असे, आणि गावच्या प्रेमळ भाजीवाल्यांनी कॉप्लीमेंटरी म्हणून दिलेल्या चवळीच्या शेंगांची एवढीशी गड्डी, रसरशीत टोमेटो, कोवळया भेंड्या चबरत मजेत बागडत असे.

तू दाढी करताना तुझ्या गुडघ्यापर्यंत पोहोचणारे माझे डोळे, मन भरुन तुला बघत राहत. आणि तू फेसाने भरलेला ब्रश माझ्या गालावर टेकवायचास, मी लटकं रागवायचे पण खरं सांगू तेवढ्या करताच मी तुझ्या आसपास घुटमळत असायचे..

रेडियोचे फाईन ट्युनिंग करतानाची तुझी तन्मयता मी डोळयात प्राण आणून बघत असे.

तुला आठवतं बाबा, आपल्या मनूच्या पिल्लाला कुत्र्याने पळवून नेलं त्यानंतरचे दोन दिवस आपण दोघांनी कसे उदासपणे काढले होते? आपण दोघे सारखेच वेडे होतो नं रे, किंवा हे वेड तूच माझ्यात पेरलं होतंस.

तू तुझ्या अडनिड्या वेळच्या ड्युटी करून यायचास, आपलं पिल्लू जेवता जेवता झोपतं हे ठावूक असल्याने, कितीही दमलेला असलास तरी माझा बिछाना आधी बनवून मग जेवायला बसायचास, आणि हातात घास असतानाच माझे डोळे पेंगायचे, तू मला बाहुलीसारखे उचलून, हात तोंड धुवून बिछान्यात पिसासारखं  ठेवायचास.

मला अजिबात आवडत नसे तरी तू कधीतरी गावाला जायला निघायचास, मी एवढासा जीव पण ते गावही एवढंसं आणि माणसं सगळी आपली , एकट्याने परत घरी जाण्याची काळजी नसायची, मग मीही तुला सोडायला स्टेशन पर्यंत यायचे. तू तिथल्याच स्टॉलवरून मला बिस्किटाचा पुडा घेऊन द्यायचास, मला काही काही नको वाटायचं, फक्त तू हवा असायचास.. तुला घेऊन जाणारी गाडी येउच नये अशी मी मनातल्या मनात इच्छा करत राहायचे पण ती दुष्ट गाडी यायची, माझा इवलासा हात कष्टाने सोडवून घेत तू डब्यात चढायचास, आपली ब्याग आत ठेऊन परत दारात यायचास, मी फक्त तुझ्याकडे बघत रहायचे, आणि जमेल तेवढा वेळ तुझा हात धरून ठेवायचे, गार्डची शिट्टी वाजून हलक्याशा धक्क्याने गाडी सुरु व्हायची, तू मला दूर व्हायला सांगायचास. माझ्या छोट्या पावलांच्या गतीपेक्षा गाडीच्या चाकांची गती भारी ठरत तू उभा असलेला डबा दूर दूर सरकू लागायचा, आपण एकमेकांना दिसेपर्यंत हात हलवत राहायचो.

बघता बघता तू एक ठिपका होऊन दिसेनासा व्हायचास, दूर  धुराची एक फिकट रेष तेवढी विरत विरत जायची.

माझी धुरकटलेली नजर तुला शोधत राहायची ……. बराच वेळ ……. अगदी आत्तापर्यंत म्हण ना.

बघ ना बाबा, आजही मी तुला शोधतेच आहे रे, आत्ताही माझी नजर तशीच ओली धुरकट झाली आहे आणि माझ्या मुठी घट्ट बंद.

तू दिलेला बिस्किटाचा पुडा मी तसाच जपून ठेवलाय माझ्या मुठीत, मी घाबरते रे, चुकून मुठ उघडलीच तर सगळं काही सांडून जाईल, एवढी वर्ष घट्ट धरून ठेवलेलं. तुझं माझं गुपित. घाबरते मी.

तू ऐकतोयस ना बाबा?

*************************

# कसं वाटलं पुस्तक मित्रांनो?

फुकट असलं तरी दर्जेदार आहे ना?

काही लोकांचा असा समज आहे की जे फुकट मिळतं ते कमी दर्जाचं असेल. पण तसं नसतं. आपल्याला आपले आईवडील मिळतात ना की ते आपण विकत घेतो? आणि त्यांचे संस्कार? आणि आपला देश आपलं राष्ट्रीयत्व? अगदी आपल्या आजूबाजूच्या हवेतला ऑक्सिजनही फुकटच मिळतो ना. आणि हा मौल्यवान मनुष्यजन्मही फुकटच मिळाला की आपल्याला!

तेव्हा मित्रांनो जे जे फुकट ते ते फ़ालतू असा समज असलेल्या लोकांना एकदा ई साहित्यच्या साइटवर आणा. ई साहित्यची पुस्तकं वाचायला द्या. तुम्ही जे पेराल तेच उगवेल. जर तुम्ही समाजात चांगली मूल्यं पेराल तर तुम्हालाही या समाजात चांगली वागणूक मिळेल. समाज म्हणजे आपणच की. निदान आपल्या आजूबाजूचा समाज तरी मूल्यप्रधान करुया.सगळं काही पैशानंच करायचा अट्टाहास नाही चालणार.

चला तर मित्रांनो, एक भव्य चळवळ उभारुया. यात प्रत्येकाने आपला सहभाग घेतला तर हा बाराकोटींचा महाराष्ट्र जगातला सर्वोत्कृष्ट अभिरुचीपूर्ण वाचकांचा प्रदेश बनायला वेळ लागणार नाही.

टीम ई साहित्य

esahity@gmail.com

www.esahity.com

एक प्रसन्न अनुभव